नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २०९ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. ०९ जुलै २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी सोहळ्याचे प्रस्थान

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असलेल्या श्रीक्षेत्र नेवासा येथून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पायी पालखी दिंडीचे आज, बुधवारी पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. शासनाची अधिकृत मान्यता मिळाल्यानंतरचा हा पहिलाच पालखी सोहळा असल्याने यंदाचा सोहळा विशेष उत्साहात सुरू झाला. सुमारे ३० दिंड्यांसह हजारो वारकरी "ज्ञानोबा माऊली तुकाराम"च्या अखंड नामघोषात सहभागी झाले. नेवासे बस स्थानक परिसरात पालखीचा पहिला रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात रंगला.

दिंडीचे नेतृत्व ज्ञानेश्वर मंदिराचे देविदास महाराज म्हस्के, हभप रामभाऊ राऊत आणि राम महाराज झिंजुरके करत आहेत. प्रस्थानापूर्वी माऊलींच्या पादुकांचे व पैस खांबाचे पूजन भास्करगिरी महाराज, उद्धव महाराज, ज्ञानेश्वर कदम, देविदास महाराज म्हस्के, रमेशानंदगिरीजी महाराज, ऋषिनाथ महाराज, ज्ञानेश्वर महाराज यांच्या हस्ते मंत्रघोषात करण्यात आले. संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातून पालखी सोहळ्यास प्रारंभ झाला. पालखीच्या रथाचे मानाचे बैल व मानाचे अश्वाचे पूजन करण्यात आले. यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे, रत्नमाला लंघे, देवस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, माजी आमदार नरेंद्र घुले, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, शंकरराव लोखंडे, प्रभाकरराव शिंदे, उदयन गडाख, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, डॉ. क्षितिज घुले, नंदकुमार पाटील, अ‍ॅड. संजय सुखदान यांच्या हस्ते पालखी रथातील पादुकांचे पूजन करण्यात आले.



दिंडीच्या अग्रभागी भागवत धर्माची पताका, त्यामागे डोक्यावर तुळशी कलश घेतलेल्या महिला, भजनी मंडळे, टाळ-मृदुंगाच्या गजरात चालणारे वारकरी आणि पुष्पांनी सजविलेल्या चांदीच्या रथात माऊलींच्या पादुका होत्या. रथाचे पुढे मानाच्या दोन दिंड्या होत्या. इतर दिंड्या शिस्तीत पालखीच्या मागे चालल्या. दिंडीने नेवासे शहराला प्रदक्षिणा घातली.

### नेवाशात रंगला पहिला रिंगण सोहळा

नेवासे शहरातील विविध चौकांत फटाक्यांची आतषबाजी, तोफांची सलामी, रांगोळ्या आणि पुष्पवृष्टी करून पालखीचे स्वागत करण्यात आले. प्रदक्षिणामार्ग नंदकुमार खरात महाराज, उद्धव महाराज नेवासकर, अंकुश महाराज जगताप यांनी पालखीचे स्वागत केले. नगरपंचायत चौकात स्व. राजेंद्र मापारी मित्र मंडळाने जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली, तर नगरसेवक स्वप्नील मापारी यांनी संतांचा सत्कार केला.

### व्यसनमुक्तीची दिंडी

नेवासा पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रताप दराडे यांच्या संकल्पनेतून व चित्रकार भरतकुमार उदावंत आणि सत्यजित उदावंत यांच्या पुढाकारातून याच दिंडीमध्ये व्यसनमुक्तीची दिंडी देखील निघाली. चित्रकार उदास यांनी रेखाटलेले व्यसनमुक्तीचे घोषवाक्य असलेले फलक आमदार लंघे, पोलीस निरीक्षक दराडे यांच्यासह दिंडीतील सर्वच महाराज व महिला मंडळांनी हाती घेतले होते.

## पाताळगंगा नदीत हजारो गॅस सिलेंडर आलेच कसे?

पाताळगंगा : (स. गांवकरी)

पाताळगंगा नदीत बुधवारी दुपारी तीन हजारहून अधिक सिलेंडर वाहून आले. त्यामुळे रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली. नदीतून वाहून येणाऱ्या हजारो सिलेंडर्सला घेण्यासाठी खारपाडा झुंबड उडाली.

बुधवारी दुपारी तीन साडे तीनची वेळ, मुंबई गोवा महामार्गावरवर वाहनांची वर्दळ सुरळीत सुरू होती. पावसाच्या सरी बरसत होत्या. त्यामुळे नद्यां नाले ओसंडून वाहत होते. खारपाडा पूलाखालून पाताळगंगा नदी दुथडीभरून वाहत होती. याच वेळी पूलावरून जाणाऱ्या काही प्रवाश्यांना नदी पात्रातून गॅस सिलेंडर वाहून येतांना दिसले. थोड्या वेळाने सिलेंडर वाहून येण्याचे प्रमाण अधिकच वाढले. हजारो सिलेंडर पाण्याच्या प्रवाहासोबत नदी पात्रातून वाहून येऊ लागले. त्यामुळे एकच खळबळ उडाली. प्रवाश्यांनी या घटनेची वर्दी स्थानिक प्रशासनाला दिली. तेव्हा हे सिलेंडर एचपीसीएल कंपनीचे असल्याचा खूलासा झाला. नदी पात्रातून हजारो सिलेंडर वाहून येऊ लागल्याने, प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाल्या. त्यांनी सिलेंडर कुठून आले त्याचा मागोवा घेण्यास सुरूवात केली. तेव्हा हे सर्व सिलेंडर एचपीसिएल कंपनीचे असल्याचा खुलासा झाला. पाताळगंगा औद्योगिक वसाहतीमध्ये चावणे येथे बॉटलींग प्लांटमधून वाहून आल्याची बाब समोर आली. खालापूर परिसरात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे पाताळगंगा नदी आधीच दुथडी भरून वाहत होती. यातच रसायनी चावणे परिसरात आलेल्या अतिवृष्टीमुळे एचपीसीएल कंपनीच्या बॉटलींग प्लांटमध्ये अचानक पूरस्थिती उद्भवली. यावेळी एलपीजी गॅस पुर्नभरणासाठी आलेले हजारो सिलेंडर कंपनीच्या परिसरात ठेवण्यात आले होते. हे सिंलेडर पाण्याच्या प्रवाहासोबत नदी पात्रात वाहून गेले. पाण्याचा लोट इतका वेगवान होता की सिलेंडरला वाहून जाण्यापासून रोखण्याची संधीही मिळाली नाही. प्राथमिक माहितीनूसार जवळपास तीन हजार सिलेंडर पाण्याच्या प्रवाहासोबत पाण्यात वाहून गेल्याचे समोर आले. नदी पात्रात वाहून आलेले गॅस सिलेंडर काही रिकामे तर काही भरलेले आहेत. रिकाम्या सिलेंडरमुळे कुठलाही धोका संभावत नसला तरी भरलेल्या गॅस सिलेंडरमुळे धोका उद्भवण्याची शक्यता नाकारता येणार नाही. भरलेला सिलेंडर जोरात आपटल्यास अथवा फुटल्यास त्यातून गॅस गळती होऊ शकते, त्यामुळे सिलेंडर हाताळतांना खबरदारी घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. नदी पात्रातील सिलेंडर जीव धोक्यात घालून हाताळणी करण्याचा प्रयत्न करून नये असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



## थोडक्यात...

### १० जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश

पिंपरी (स. गांवकरी) : पिंपरी-चिंचवडमधील मोशीमध्ये एका कचरा डेपोत बुधवारी मोठी दुर्घटना घडली. एका इमारतीचा काही भाग अचानक कोसळून ढिगाऱ्याखाली जवळपास १५ ते २० कामगार अडकल्याची भिती व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. या दुर्घटनेत ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान, पोलीस, एनडीआरएफचे जवान, आर्मीचे जवान आणि स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून बचावकार्य सुरू आहे. आता घटनास्थळी मंत्री गिरीश महाजन यांनी देखील भेट देत घटनेचा आढावा घेतला आहे. तसेच युद्धपातळीवर बचावकार्य सुरू असल्याची माहिती त्यांनी सांगितली. ढिगाऱ्याखालून आतापर्यंत १० जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आल्याची माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना दिली. तसेच बचावकार्य सकाळपर्यंत सुरू राहणार असून सर्वांना सुखरूप बाहेर काढण्यात येईल, असंही महाजन यांनी सांगितलं आहे.

### बोगस डॉक्टरांविरुद्ध गुन्हे दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्हा आरोग्य विभागाने बोगस डॉक्टरविरुद्ध सुरू केलेल्या शोध मोहिमेत गेल्या तीन महिन्यात ७ जणांविरुद्ध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल केले आहेत. यासंदर्भात आरोग्य यंत्रणेतील वैद्यकीय अधिकारी तसेच तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोलिसांकडे फिर्यादी दाखल केल्या आहेत. जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी ही माहिती दिली. श्रीगोंद्यात दोन, पाथर्डी, शेवगाव, श्रीरामपूर, संगमनेर व राहुरी येथे प्रत्येकी एक बोगस डॉक्टर आढळला. राहुरी येथील बोगस डॉक्टरने आरोग्य यंत्रणेने त्याच्या निसर्गोपचार केंद्राविरुद्ध कारवाई करू नये, तपासणी करू नये यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र उच्च न्यायालयाची स्थगिती उठताच त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तो तब्बल ४३ खाटांचे निसर्गोपचार केंद्र चालवत होता. शेवगावमध्ये तर मोठा अजब प्रकार उघडकीस आला. डॉक्टर मुलाच्या नावाखाली वडीलच अवैधरित्या वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे व रुग्णांवर औषधोपचार करत असल्याचे आढळले.

### वारणाकाठी चिंता

सांगली (स. गांवकरी) : रात्रीपासून कमी झालेल्या पावसाचा जोर बुधवारी दुपारनंतर पुन्हा वाढला आहे. वारणा नदीची पाणी पातळी सततच्या पावसामुळे वाढत असल्याने सतर्क प्रशासनाकडून आज शिराळा येथे गाव पातळीवरील शासकीय कर्मचारी व कार्यकर्त्यांना राज्य प्रतिसाद दलाच्या सैनिकांकडून बचाव कार्याची प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली. पश्चिम भागात पडलेल्या संततधार पावसाने चांदोली धरणातील पाणीसाठा पन्नास टक्क्याहून अधिक झाला असून वारणा नदीचे पाणी अद्याप पात्राबाहेर आहे. गेल्या २४ तासात सांगली जिल्ह्यात सरासरी केवळ ७.३ मिलीमीटर पाउस झाला. काल सायंकाळी एक सर आल्यानंतर पावसाने पूर्ण उघडीप दिली असून आज चार दिवसानंतर सुर्यदर्शन झाले.ढगाळ हवामान कायम असल्याने उन्हाची तीव्रताही अधिक जाणवत होती. सलग चार दिवस कमी अधिक पडत असल्याने निर्माण झालेला हवेतील गारवाही आजच्या तीव्र उष्म्यामुळे गायब झाला आहे. दुपारनंतर जोरदार वारे सुरू झाल्याने पुन्हा पावसाळी स्थिती निर्माण झाली होती. सायंकाळी सांगली, मिरज शहरात जोरदार पावसाच्या सरी आल्या.

## गावराई सड्यावरील कातळशिल्पे चिरेखाणीच्या भक्ष्यस्थानी

सावंतवाडी : (स. गांवकरी)

कुडाळ तालुक्यातील गावराई सडा येथे असलेली बहुसंख्य कातळशिल्पे चिरेखाणीच्या भक्ष्यस्थानी पडली आहेत. याठिकाणी २५ ते ३० कातळशिल्पे होती, असे स्थानिक रहिवासी सांगतात. मात्र आता तेथे हाताच्या बोटावर मोजण्याएवढी कातळशिल्पे उरली आहेत, अशी माहिती कातळशिल्प संशोधक सतीश लळीत यांनी दिली. गावराई हे छोटेसे निसर्गसुंदर गाव कसाल मालवण रस्त्यावर सुकळवाडजवळ आहे. गावातील गिरोबा मंदिराकडून एक घाटरस्ता गावाच्या उत्तरेला असलेल्या कातळसड्यावर जातो. या सड्यावर २५ ते ३० कातळशिल्पे होती. मात्र गेल्या काही वर्षात येथे सुरू झालेल्या एका मोठ्या चिरेखाणीत यापैकी बहुतेक कातळशिल्पे नष्ट झाल्याचे नुकत्याच केलेल्या पाहणीत आढळून आले, असे श्री. लळीत यांनी सांगितले. या पाहणीवेळी मिहिर प्रभाकर वाईरकर उपस्थित होते. सद्यस्थितीत फक्त पाचसहा कातळशिल्पे सुरक्षित असून त्यात एक मनुष्याकृती, दोन मासे, चतुष्पाद प्राणी आणि काही भौमितिक आकृत्यांचा समावेश आहे. काही कातळशिल्पांवरून चिरे वाहतुकीच्या डंपर्ससाठी रस्ता तयार झाला आहे. एकीकडे शासन कातळशिल्पांची माहिती सर्वदूर पोचविण्यासाठी करोडो रुपये खर्चाचे माहितीपट तयार करण्याची घोषणा करीत आहे. मात्र रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातळशिल्पांचे सर्वेक्षण, जीपीएस मॅपिंग, संरक्षण या अत्यंत प्राथमिक बाबी ज्या तातडीने होणे गरजेचे आहे, त्याकडे लक्षच दिले जात नाही.




## मुलांनी सांभाळ केला नाही, तर दिलेली मालमत्ता आई-वडील परत घेऊ शकतात

### उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय!

मुंबई : (स. गांवकरी)

वृद्धापकाळात सांभाळ करण्याच्या अटीवर आई-वडिलांनी मुलांना दिलेली मालमत्ता, मुलांनी शब्द न पाळल्यास परत घेतली जाऊ शकते, असा एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय मुंबई उच्च न्यायालयानं दिला आहे. विशेष म्हणजे, आई-वडील आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वावलंबी असले, तरीही त्यांना हा अधिकार असेल, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्वाचा ठरणार आहे. हा संपूर्ण वाद मुंबईतील लोअर परळ परिसरातील आहे. येथील एका ६८ वर्षीय सराफा व्यावसायिकाने २००५ मध्ये एक फ्लॅट खरेदी केला होता. या घरात ते आपली बायको, मुलगा आणि सुनेसोबत राहत होते. तब्बल १८ वर्षे एकत्र राहिल्यानंतर, मे २०२३ मध्ये वडिलांनी एका 'गिफ्ट डीड'द्वारे (बक्षीसपत्र) हा फ्लॅट आपल्या ४२ वर्षीय मुलाच्या नावावर केला. हे बक्षीसपत्र करताना एकच अट होती, मुलाने वृद्ध आई-वडिलांचा सांभाळ करावा आणि त्यांच्या मूलभूत गरजा भागवाव्यात. मात्र नेमके याच्या उलटे झाले. बक्षीसपत्र झाल्यानंतर काही दिवसांतच घरात वाद सुरू झाले. मुला-सुनेचा त्रास इतका वाढला की, २०२५ मध्ये या वृद्ध दांपत्याला स्वतःचं घर सोडून बाहेर पडावं लागलं. अखेर वडिलांनी 'ज्येष्ठ नागरिक देखभाल आणि कल्याण कायदा, २००७' अंतर्गत असलेल्या लवादाकडे न्याय मागितला. लवादाने सर्व बाजू ऐकून घेतल्यानंतर मुलाला मोठा झटका दिला. न्यायालयाने मुलाला आणि त्याच्या कुटुंबाला ६० दिवसांच्या आत तो फ्लॅट रिकामा करून वडिलांच्या स्वाधीन करण्याचे आदेश दिले. लवादाच्या या आदेशाविरोधात मुलाने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. "माझे वडील आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत. त्यांचा स्वतःचा व्यवसाय आहे आणि इतरही मालमत्ता आहेत. ते हलाखीचे जीवन जगत नसून स्वतःचा खर्च उचलण्यास पूर्णपणे समर्थ आहेत," असा युक्तिवाद मुलानं न्यायालयात केला. परंतु, प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अनखड यांच्या खंडपीठाने मुलाचा हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला. कायद्यातील अटींची पूर्तता होत नसेल, तर मुलाला दिलेले बक्षीसपत्र 'बेकायदेशीर' ठरवले जाऊ शकते. मुंबई उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. "मुलगा सांभाळेल" या विश्वासाने आपली हक्काची कमाई मुलांच्या नावावर करणाऱ्या, पण नंतर उपेक्षित आयुष्य जगणाऱ्या वृद्ध माता-पित्यांसाठी हा कायदा आणि हा निर्णय संरक्षणाची भक्कम ढालच बनला आहे.



### कोर्टाचे महत्त्वाचे निरीक्षण

उच्च न्यायालयाने 'ज्येष्ठ नागरिक कायदा, २००७' मधील कलम २३ चा संदर्भ देत स्पष्ट केले की: ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक स्थिती कशी आहे, ते श्रीमंत आहेत की गरीब, याच्याशी कायद्याच्या कलम २३ चा काहीही संबंध नाही.

जर मालमत्ता हस्तांतरित करताना आई-वडिलांच्या मूलभूत गरजा आणि शारीरिक गरजांची काळजी घेण्याची अट असेल, आणि मुलाने ती पाळली नाही, तर ते हस्तांतरण रद्द करण्याचा पूर्ण अधिकार लवादाला आहे. – मुंबई उच्च न्यायालय

# शिंदे-फडणवीसांमध्ये सुप्त संघर्ष?

### महायुतीत 'नो-एन्ट्री' असा बोर्ड का लागला?

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील फोडाफोडीच्या राजकारणावर भाष्य करताना सत्ताधारी भाजपाप्रणीत महायुतीत यापुढे कोणताही नवा राजकीय पक्ष सामील होणार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्यामुळे राज्यातील नव्या राजकीय समीकरणांच्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दिल्लीत भेट घेतल्यानंतर मंगळवारी फडणवीसांनी मुंबईत माध्यमांशी संवाद साधला. भाजपा आता कोणत्याही नव्या पक्षाला महायुतीत सामावून घेणार नाही. आम्ही नव्या मित्रपक्षांसाठी आमचे दरवाजे बंद केले असून, पक्षाच्या विस्तारासाठी कोणाचाही पक्ष फोडण्याचा आमचा हेतू नाही. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात भाजपाकडून फूट पाडण्याचा प्रयत्न केला जात असल्याच्या सर्व चर्चा पूर्णपणे निराधार आणि तथ्यहीन असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. गेल्या महिन्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यानंतर शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होणार असल्याच्या चर्चांनी जोर पकडला. त्यातच राष्ट्रवादीच्या एका वरिष्ठ नेत्याने मुंबईत भाजपाच्या प्रभावशाली नेत्याची भेट घेतल्याचे वृत्त समोर आल्यानंतर या चर्चांना आणखीनच हवा मिळाली. या बैठकीत दोन्ही नेत्यांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीत संभाव्य प्रवेशाबाबत चर्चा झाल्याची माहिती समोर आली. यादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेल्या स्पष्ट संकेताचे पडसाद मुंबईतील भाजपाच्या प्रदेश कार्यालयातही उमटल्याचे पाहायला मिळाले. विरोधी पक्षांतील कोणत्याही नेत्याला पक्षप्रवेशाबाबतचे आश्वासन देऊ नये, अशा सूचना भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना देण्यात आल्याचे सूत्रांकडून समजते. एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीत सध्याची



स्थिती कायम राहणार असल्याचे संकेत दिले असले तरी दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतेच 'ऑपरेशन टायगर' राबवले. त्या अंतर्गत ठाकरे गटातील सहा खासदार आणि विधानपरिषदेच्या एका आमदाराने शिंदेसेनेत प्रवेश केला.

२०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर फडणवीस आणि शिंदे यांच्यातील संबंध ताणले गेले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली असतानाच ही घडामोड घडली. सूत्रांच्या माहितीनुसार, ऑपरेशन टायगर' राबवले जात असताना राज्यातील भाजपाच्या वरिष्ठ नेते त्याविषयी फारसे उत्साही नव्हते. अशा फोडाफोडीच्या राजकारणामुळे राज्यातील जनतेचे लक्ष सरकारच्या कामकाजापेक्षा पक्षांतराच्या राजकारणाकडे वळते, असे काही नेत्यांचे मत होते. त्याशिवाय या पक्षप्रवेशामुळे शिंदे गटाचे लोकसभेतील संख्याबर १३ इतके झाल्यामुळे त्यांची महायुतीतील राजकीय ताकद आणखीनच वाढणार असल्याची भीती काही नेत्यांना सतावत होती. त्याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात सुप्त संघर्ष होत असल्याची कुजबूजही सुरू झाली.

## अतिवृष्टीचे रायगड जिल्ह्यात ११ जणांचा बळी

अलिबाग : (स. गांवकरी)

रायगड जिल्ह्याला गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे आत्तापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे. तर दरड कोसळून ३ जण जखमी झाले आहेत. जुलै महिन्याच्या सुरवातीपासून रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस बरसत आहे. सतत होणाऱ्या अतिवृष्टीमुळे अंबा, सावित्री, कुंडलिका, पाताळगंगा, भोगावती, बाळगंगा नद्यांची पाणी पातळी सतत वाढत आहे. त्यामुळे ठिकठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली.

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात ५५ ठिकाणी दरडी कोसळल्या. यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत आणि वित्तहानी झाली. जिल्ह्यात गेल्या सात दिवसात ११ जणांचा अतिवृष्टीमुळे मृत्यू झाला. ज्यात पनवेल तालुक्यात ४, कर्जत तालुक्यात ३, महाड तालुक्यात २, तर अलिबाग आणि तळा तालुक्यातील प्रत्येकी एक जणांचा समावेश आहे. महत्वाची बाब म्हणजे यात वर्षासहली जीवावर बेतण्याचे प्रमाणही लक्षणीय आहे.



तळा तालुक्यातील फळशेत कर्नाळा येथील वेदन जनार्दन भोसले याचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला. दिघोटी पनवेल येथील मच्छिंद्र गणपत गावंड, आपटा येथील प्रज्वल प्रदीप कांबळे, वाघाचीवाडी येथी सुमित यशवंत पवार यांचा बूडून मृत्यू झाला. खारघर येथील अश्रफ सद्दाम शेख याचा खेकडे पकडतांना बुडून मृत्यू झाला.

कर्जत तालुक्यातील नेरळ येथे टपालवाडी धबधब्यात पावसाळी पर्यटनासाठी गेलेल्या आरबीन जाहीरउद्दीन शेख यांचा बुडून मृत्यू झाला आहे. कर्जत तालुक्यातील बेडीसगाव येथे भगीरथ धबधब्यावर ओकार संतोष साहू याचा तर भागुची वाडी येथे मासेमारीसाठी गेलेलल्या नामदेव वाळकू पारधी याचा पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने मृत्यू झाला.

महाड येथे कांबळे बिरवडी येथे पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून सुधीर सुंदर देशमुख यांचा मृत्यू झाला तर कुसगाव येथे मासेमारीसाठी गेलेला सुहेल सलीम शेख याचा बुडून मृत्यू झाला. अलिबाग मध्ये वेळवली खानाव येथील चांगु कमळू घरत यांचा पूलाला पडलेल्या भगदाडात पडल्याने मृत्यू झाला. या शिवाय दरड कोसळून तीन जण जखमी झाले आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आंबे, हातवीज व इंगळून भागात दरड कोसळल्याने वाहतुकीस अडथळा

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर आदिवासी दुर्गम भागातील आंबे , हातवीज व इंगळुन या भागात मुसळधार पाऊस पडल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे . या भागातील ठिकठिकाणी दरड , झाडे झुडपे कोसळल्याने रस्ता वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे . येथील सर्व आदिवासी बांधवांनी घरीच थांबा, गरज असल्यास रस्त्यावरून जाताना काळजी घ्यावी . रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ मोठे दगड मातीचे ढीग कोसळले आहेत . त्यामुळे वाहतुकीस ये -- जा खुला झाल्याशिवाय कोणीही रस्त्याने जाऊ नये . पावसाचा जोर सातत्याने वाढत असल्यामुळे डोंगरावरील व टेकडी येथील माती व झाडेझुडपे, रस्त्यावर पडण्याची दाट शक्यता आहे . त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी असे आव्हान तहसीलदार बाळासाहेब शिरसाठ यांनी केले आहे. आज दि . ६ वार सोमवार रोजी जुन्नर , ८० मि . मी ., नारायणगाव ६० मि.मी , ओतूर ४८ मि. मी , वडगाव आनंद १५ मि. मी , निमगाव सावा १९ मि. मी., बेल्हे २० मि मी ., आपटाळे ९८ मि. मी ., डिंगोरे १२० मि. मी. , व राजुर १३७ मि . मी . पाऊस पडला आहे.

### मुळाधरणाच्या पाणलोटात पावसाची सेंचुरीमय बॅटिंग सुरूच

राहुरी (स. गांवकरी) : आज दुपारी बारा वाजता पुन्हा पाच मीटरला कोतुळकडील मुळा नदी 27 हजार क्युसेकने पाण्याची आवक होत असून कोतुळ भागात मुळा नदीला पुन्हा महापूर आला आहे. गेल्या चार दिवसापासून मुळा धरणाच्या पाणलोटात पावसाचा जोरदार मुक्काम असून सातत्याने मोठ्या प्रमाणात होणाऱ्या पावसाने धरणाकडे झपाट्याने पाण्याची आवक होत आहे .आज सकाळी मुळा धरणसाठा ८ हजार ६८६ दशलक्ष घनफूट इतका होता तर धरणाकडे सकाळी ६ वाजता ६ हजार ९५१ क्युसेकने आवक होती .२४ तासात दिड TMC [ १४६० द लघन फूट] पाण्याची आवक झाली .२४ तासात सव्वा दोन TMC नवे पाणी जमा होत २ दिवसात पावणे सहा फूट पाणी पातळीत वाढ झाली .आज सकाळी धरणाकडे 6 हजार 951 क्यूसेकने सुरू होती , ती नऊ वाजता वाढत 11 हजार क्यूसेकने तर दुपारी बारा वाजता पाच मीटरला 27 हजार 165 कोतुळकडील मुळा नदीतून धरणाकडे सुरू होती .अशीच पाण्याची आवक राहिल्यासयेत्या दोन-तीन दिवसात मुळा धरण निम्मे भरण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अभियंता पी व्ही पाटील शाखा अभियंता राजेंद्र पारखे धरणाच्या पाणी पातळीकडे लक्ष देऊन आहेत.



### ठाणे मनपा आपत्ती व्यवस्थापनाचा उपमुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा

ठाणे (स. गांवकरी) : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापनाला भेट देवून शहरातील परिस्थितीचा आढावा घेतला. त्याचबरोबर आपत्तीच्या काळात कामात हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाईचे निर्देश दिले. या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी एका अधिकाऱ्याची तात्काळ बदली तर एका अधिकाऱ्याला निलंबनाची नोटीस बजावली. यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, मधुकर बोडके, उपनगरअभियंता शुभांगी केसवानी, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी, वरिष्ठ उद्यान अधीक्षक केदार पाटील, शिवसेना गटनेते पवन कदम, नगरसेवक राम रेपाळे, रमाकांत मढवी, राजेश मोरे, विकास रेपाळे, नगरसेविका नम्रता भोसले आदी उपस्थित होते. ताशी 80 ते 90 कि.मी पेक्षा वेगाने वाहणारे वारे आणि जोरदार अतिवृष्टीमुळे शहरात झाडे व फांद्या पडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्र्यांनी आपत्कालीन कक्षाला भेट दिली. या भेटीत त्यांनी तातडीने सर्व झाडांचे शास्त्रोक्त पध्दतीने ऑडिट करण्याचे निर्देश आयुक्तांना दिले. संबंधित झाडांची शेवटची छाटणी (ट्रिमिंग) कधी करण्यात आली होती, झाडांची स्थिती काय होती आणि कोणत्या कारणांमुळे ती पडली याचा सखोल अभ्यास करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

### शिळ गावातील पाणी काढण्यासाठी भाजपा नगरसेविका स्वतः जेसिबीवर



ठाणे (स. गांवकरी) : ठाणे पालिकेच्या दिवा प्रभागातील वार्ड क्र. २९ मधील शिळ गावात मुसळधार पावसाने एक ते दीड फुटापर्यंत पावसाचे पाणी शिरले होते. परिणामी नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. याची माहिती मिळताच भाजपा नगरसेविका वेदिका पाटील यांनी स्वतः जेसीबीची सोय करून स्वतः जेसीबीवर बसून नाल्यामध्ये अटकलेला गाळ काढून घेतला. त्याच बरोबर नैसर्गिक नाले खुले केले व पाणी निचरा करण्यासाठी बाजूच्या शेतातून पाण्याचा प्रवाह काढला. पाण्याचा प्रवाह वाहण्याची अडचण दूर करण्यासाठी शिळ गावातील शेतकरी पंडित भोईर आणि संजय श्रीपत आलिमकर यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे पुढील कामाचा मार्ग अधिक सुकर झाला. त्याबद्दल नगरसेविकेने व ग्रामस्थांनी त्यांचे मनपूर्वक आभार मानले. प्रसंगी शिळगावातील विनोद वास्कर, शरद पाटील आणि प्रशांत भोईर तसेच दिवा प्रभाग समितीचे कार्यकारी अभियंता अंजुम, उप कार्यकारी अभियंता भालेराव व कनिष्ठ अभियंता आदित्य डावखर हे देखील उपस्थित होते.

# आमदार शेखर निकम यांच्या पाठपुराव्याला यश

## कोयना प्रकल्पग्रस्त आणि नवीन कोळकेवाडीच्या प्रश्नांवर शासनाची सकारात्मक भूमिका

मुंबई : (स. गांवकरी)

कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या चिपळूण तालुक्यातील नवीन कोळकेवाडी येथील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा पाच दशकांहून अधिक काळ प्रलंबित असलेला शेतजमिनीचा प्रश्न तसेच नवीन कोळकेवाडी गावाच्या महसुली नोंदीतील तांत्रिक त्रुटी दूर करण्याच्या मागणीला महत्त्वपूर्ण गती मिळाली आहे. चिपळूण-संगमेश्वरचे आमदार शेखर गोविंदराव निकम यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन दोन्ही विषयांबाबत सविस्तर निवेदने सादर केली. त्यानंतर महसूल मंत्र्यांनी कोकण विभागीय आयुक्तांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.



आमदार निकम यांनी सादर केलेल्या निवेदनात नवीन कोळकेवाडी येथील ६१ प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन झाल्यानंतरही त्यांना नियमानुसार शेतीयोग्य जमीन मिळालेली नसल्याची बाब निदर्शनास आणून दिली. रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोंदीनुसार ५० कुटुंबांना पर्यायी जमिनीचे वाटप दाखविण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात ४७ कुटुंबांना नियमानुसार चार एकरऐवजी केवळ दोन एकर जमीन मिळाल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. शहापूर येथे पुनर्वसित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना प्रत्येकी चार एकर जमीन देण्यात आल्याचे उदाहरण देत नवीन कोळकेवाडीतील प्रकल्पग्रस्तांनाही समान न्याय देण्याची मागणी करण्यात आली. पर्यायी जमीन उपलब्ध करून द्यावी किंवा त्याऐवजी कायदेशीर आर्थिक भरपाईचे पॅकेज मंजूर करावे, अशीही मागणी करण्यात आली.

या निवेदनाची दखल घेत महसूल मंत्री बावनकुळे यांनी कोकण विभागीय आयुक्तांना शासन स्तरावर २१ दिवसांच्या आत बैठक घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे तब्बल ५२ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नाच्या सोडवणुकीला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच भेटीत आमदार निकम यांनी नवीन कोळकेवाडी गावाच्या महसुली नोंदीतील तांत्रिक त्रुटीचाही मुद्दा मांडला. सन १९७३ मध्ये कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करून स्थापन करण्यात आलेल्या या गावाला १९९२ मध्ये स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाला. मात्र, राजपत्रात गावाचे नाव केवळ 'कोळकेवाडी' असे नमूद झाल्यामुळे एकाच तालुक्यात एकाच नावाची दोन गावे अस्तित्वात आली असून महसुली नोंदी, दाखले आणि इतर प्रशासकीय कामकाजात ग्रामस्थांना सातत्याने अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले.

या मागणीचीही महसूल मंत्र्यांनी तातडीने दखल घेत कोकण विभागीय आयुक्तांना १५ दिवसांच्या आत आवश्यक कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे नवीन कोळकेवाडीला स्वतंत्र महसुली ओळख मिळण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेल्याचे मानले जात आहे.

महसूल मंत्र्यांच्या निर्देशांमुळे कोयना प्रकल्पग्रस्तांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या शेतजमिनीच्या प्रश्नासह नवीन कोळकेवाडीच्या महसुली नोंदीतील त्रुटी दूर होण्याबाबत प्रकल्पग्रस्त आणि ग्रामस्थांमध्ये आशावाद व्यक्त केला जात आहे.

## मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरला १६वे स्थान

मुंबई : (स. गांवकरी)

जागतिक वित्तीय सेवा क्षेत्रातील आघाडीची कंपनी मेटलाइफच्या ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (एमजीसीसी)ला ग्रेट प्लेस टू वर्क® संस्थेतर्फे जाहीर करण्यात आलेल्या 'भारतातील सर्वोत्तम कार्यस्थळे २०२६' या यादीत १६वा क्रमांक मिळाला आहे. विश्वास, सर्वसमावेशकता आणि नावीन्यपूर्ण कार्यसंस्कृती जोपासण्याच्या कंपनीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची ही दखल मानली जात आहे. मेटलाइफने कर्मचारी विकास, परस्पर सहकार्य आणि अर्थपूर्ण कामाला प्रोत्साहन देणारे कार्यस्थळ निर्माण करण्यावर भर दिला आहे. लोककेंद्रित दृष्टीकोन, सातत्यपूर्ण शिक्षण आणि सर्वसमावेशक नेतृत्व यांवर आधारित कार्यसंस्कृतीमुळे ही मान्यता मिळाल्याचे कंपनीने सांगितले. मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक अशिष के. श्रीवास्तव म्हणाले, "ही मान्यता आमच्यासाठी आनंदाचा आणि आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. उत्कृष्ट कार्यस्थळे एका दिवसात निर्माण होत नाहीत, ती सातत्यपूर्ण प्रयत्नांतून उभी राहतात. आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांचे मत ऐकत राहू, त्यांच्याकडून शिकत राहू आणि एकत्रितपणे आणखी उत्तम कार्यस्थळ घडवत राहू." यंदाच्या ग्रेट प्लेस टू वर्क® अभ्यासामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता युगात विश्वासार्ह नेतृत्व आणि मजबूत कार्यसंस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. भारतातील ५७ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांच्या अभिप्रायाच्या आधारे करण्यात आलेल्या या अभ्यासातून सातत्याने उत्कृष्ट कर्मचारी अनुभव देणाऱ्या संस्थांची निवड करण्यात आली.

## सगरोळीच्या शिक्षण संस्थेच्या संस्कारनेच घडलो

बिलोली : (स. गांवकरी)

संस्कृति संवर्धन मंडळ सगरोळी च्या शैक्षणिक संस्थेच्या संस्कारामुळेच मला पोलीस दलामध्ये सेवा करण्याची संधी मिळाली हे माझ भाग्य समजतो असे प्रतिपादन सेवानिवृत्त गौरवमुर्ती पोलीस उपनिरीक्षक भगवानराव मोरे यांच्या गौरव सोहळा निमित्त सगरोळी ता. बिलोली येथे आयोजित सत्कार सोहळा कार्यक्रमात सत्कार प्रसंगी बोलत होते. संस्कृति संवर्धन मंडळ सगरोळीच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल शारदानगर या शैक्षणिक संस्थेचे माजी विद्यार्थी तथा सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक भगवानराव गंगाराम मोरे देगावकर हे नुकतच 30 जुन रोजी ४० वर्षाचा सेवा कार्यकाळा नंतर सेवानिवृत्त झाले.यांच्या सेवानिवृत्त सन्मानार्थ आज दि.८ जुलै बुधवार रोजी संस्कृति संवर्धन मंडळ सगरोळी या शैक्षणिक संस्थेच्या वतिने सेवा गौरव सोहळा शाळेच्या प्रांगणात



पो.उ.नि.भगवानराव मोरे

आयोजित करण्यात आला होता. यावेळी गौरव सोहळ्यास उतर देताना गौरवमुर्ती भगवानराव मोरे म्हणाले की येथील शिक्षण संस्थेतील गुरुजन वर्ग व संस्थेचे विश्वस्त याचे मला मिळालेले योग्य मार्गदर्शन व लाभलेले आशिर्वाद यामुळेच माझ्या शालेय जिवनात योग्य दिशा मिळाल्यामुळेच मला पोलीस शिपाई ते पोलीस उपनिरीक्षक या पदावर सेवा करण्यांची संधी मिळाली आसुन सगरोळीच्या या संस्थेच्या संस्कारामुळेच माझ्या जिवनाला योग्य दिशा मिळाली आसल्याचे प्रखड मत सत्काराला उतर देताना व्यक्त केले. या वेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खाजगी सचिव तथा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ महाव्यवस्थापक - बालाजीराव पाटील खतगावकर, संस्कृति संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोदजी देशमुख, संस्थेचे सचिव डॉ. जयवंतराव जकाते यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांचे जन्मशताब्दी वर्षे २०२६ किताब व शाल, पुष्पहार देऊन मोरे यांचा सपत्नीक गौरव करण्यात आला. तर यावेळी प्रमोदजी देशमुख यानी सेवा सत्कार मुर्ती मोरे यांच्या समर्पित आणि निस्वार्थ सेवेबद्दल कर्तव्य बजावत आसताना वेळीवेळी आमच्या हाकेला दिलेली साथ त्यानी घेतलेले कष्ट आणि उत्कृष्ट सेवेतील धैर्य हे आमच्या संस्थेचा अभिमान आसल्याचे मत व्यक्त करत सेवा गौरव सोहळा निमित संस्थेच्या वतिने भरभरुन शुभेच्छा दिल्या. यावेळी मित्र परिवार शालेय विद्यार्थी व गुरुजन वर्ग, गावकरी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## निमदरी रेणुकामाता मंदिर, पाडळी स्मशानभूमी तुडुंब

शिवनेरी : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील पश्चिम भागात मुसळधार पाऊस सुरू असल्यामुळे निमदरी रेणुका माता मंदिर , पाडळी स्मशानभूमी व पद्मावती तलाव , गोळेगावचा पूल व कुमशेत येथील मुक्ताबाई मंदिर परिसर तुडुंब भरून वाहत आहेत . मीना नदी व कुकडी नदी दोन्ही नदीचे काठे धोक्याची पातळी धोक्याची पातळी ओलांडली आहे .

पश्चिम भागातील सर्व शेतामध्ये तुडुंब पाणी साचलेले आहे . यामुळे या भागातील शेतीची उभी पिके धोक्यात आली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे . सतत पाऊस सुरू असल्यामुळे नदीकाठी भीतीचे वातावरण झाले आहे . महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यांनी ठिकठिकाणी विजेचा संपर्क तुटल्यामुळे ताबडतोब लाईन दुरुस्ती करत आहे . चिल्हेवाडी धरण ७६% भरलेले आहे. तसेच धरणामध्ये सध्या ६००० क्यूसेक्स ने परिसरातील डोंगर दर्या



खोऱ्यातून पावसाचे पाणी येत आहे . सदर धरणामध्ये, सद्यस्थितीत सुरू असलेल्या पावसामुळे पाण्याची पातळी वाढला आहे. त्यामुळे धरणातून नदीमार्गे मांडवी नदीपात्रामध्ये कोणत्याही क्षणी अनियंत्रित विसर्ग सुरू होण्याची शक्यता आहे. सतत पाऊस सुरू राहिल्यास अथवा पावसाची तीव्रता वाढल्यास तसेच धरणा मध्ये पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता आहे . नदीपात्रातील विसर्गामध्ये वाढ होऊ शकते, याची नागरिकांनी नोंद घ्यावी. चिल्हेवाडी, आंबेगव्हाण, पाचघर, रोहोकडी, ई. व परिसरातील सर्व नागरिकांना विनंती करण्यात येते की, कृपया नदीपात्रात कोणीही उतरू नये. नदीपात्रात अथवा लगतच्या परिसरात जनावरे, शेतीपंप, वाहने किंवा इतर कोणतेही साहित्य असल्यास ते तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावे. सखल भागातील नागरिकांनी सतर्क राहून योग्य ती खबरदारी व दक्षता घ्यावी, तसेच संबंधित ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका यांनी नदीपात्रातील संभाव्य अनियंत्रित विसर्गाबाबत सतर्क राहून आवश्यक त्या सूचना नागरिकांना द्याव्यात.

## सतत पडणाऱ्या पावसामुळे धरण क्षेत्रामध्ये वाढ

जुन्नर : (स. गांवकरी)

- शेतकऱ्यांची उभी पिकं धोक्यात आली आहे पंचनामा करण्याची मागणी

जुन्नर तालुक्यात काही दिवसापासून सतत पडणाऱ्या पावसामुळे धरण क्षेत्रामध्ये वाढ झाली आहे . शेतकऱ्यांच्या उभ्या पिकामध्ये गेली दि. २३ जून पासून सतत पाऊस पडत आहे . या पिकाची पंचनामा करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून वारंवार होत आहे . तालुक्यात दिनांक ३० जून पासून दि . ७ जुलै पर्यंत सतत पडणाऱ्या पावसामुळे उभ्या पिकामध्ये पाणी साचलेले आहे .टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, ढोबळी ,हिरवी मिरची, मेथी, कोथिंबीर , गवार,गोंडा व सर्व फुले व इतर भाजीपाला या पिकांमध्ये पाणी साचलेले आहे. यामुळे उभी पिकं धोक्यात आलेली आहे. तालुक्यातील कृषी अधिकारी व तहसीलदार बाळासाहेब सिरसाट यांनी महसूल अधिकारी यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन ताबडतोब पंचनामा करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. पिंपळगाव जोगे धरण क्षेत्रातील दि . ७ . रोजी दुपारी २ वा . आजची जलपातळी ६८१ . ०५ मी., पूर्ण जलसाठा पातळी ६८६ मी . , जलसाठा ३७६९ . ३३७ , क्रेस्ट लेव्हल ६८२ . ८०० मी . ,= पाण्याची आवक ६६३३ क्यूसेक व एकूण आवक ६६३३ क्यूसेक आहे .चिल्हेवाडी धरण दि. ७ . रोजी दु २ . वा . आजची जलपातळी ७२६ .५६ मी ., जलसाठा पातळी ७४३ .१३५ मी.,0 जलसाठा ५०९ . ४६ एमसीएफटी आहे. उपयुक्त जलसाठा ४१६ . ७१ एमसीएफटी , क्रेस्ट लेव्हल ७३५ . १३५ मी. , पाण्याची आवक १०८३ क्यूसेक आहे. येडगाव ४९ १६ % माणिकडोह २१ ३५ % वडज ६७ .३२ % पिंपळगाव जोगे -१४.९७ % डिंभे २६ .११ % विसापुर १३.०६ % चिल्हेवाडी ५४. ५२ % व घोड ४. १५ % आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात मुसळधार पावसाचा येलो अलर्ट

**नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा**

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

भारतीय हवामान विभागाने ८ जुलै रोजी अहिल्यानगर जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यातील नद्यांमधील वाढता विसर्ग आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील पावसाच्या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या तसेच धरण परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे. सध्या जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांमध्ये विसर्ग सुरू असून आज दुपारी १२ वाजता भीमा नदीच्या दौंड पुलावरून ८५ हजार ७८४ क्युसेक, तर गोदावरी नदीपात्रात नांदूर मध्यमेश्वर धरणातून १५ हजार २४८ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. अहिल्यानगर, पुणे व नाशिक जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पाऊस झाल्यास भीमा व गोदावरी नदीच्या पाणीपातळीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच भंडारदरा, निळवंडे व मुळा धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असल्याने धरणांमध्ये पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे धरण परिसरात येणाऱ्या पर्यटकांनी तसेच प्रवरा व मुळा नदीकाठावरील नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



नागरिकांनी मेघगर्जना, वीज चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना झाडाखाली अथवा जाहिरात फलकांच्या परिसरात थांबू नये. सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटी वादळादरम्यान कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये तसेच विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल, टॉवर्स, ध्वजांचे खांब, दिव्यांचे खांब, धातूचे कुंपण, ट्रान्सफॉर्मर तसेच अधांतरी लटकणाऱ्या केबल्सपासून दूर राहावे. वीज चमकत असताना मोकळ्या जागेत असल्यास गुडघ्यावर बसून हातांनी कान झाकावेत, डोके दोन्ही गुडघ्यांमध्ये ठेवावे आणि जमिनीशी कमीतकमी संपर्क ठेवावा. जुनाट, मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतींमध्ये आश्रय घेऊ नये.

धरण व नदी परिसरात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी पाण्यात उतरू नये तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. नदी, ओढे व नाल्यांतील पाणीपातळी वाढत असल्यास प्रवाहापासून दूर राहून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. पुलांवर किंवा बंधाऱ्यांवरून पाणी वाहत असल्यास ते ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. अतिवृष्टीमुळे भूस्खलन किंवा दरडी कोसळण्याची शक्यता लक्षात घेऊन डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या नागरिकांनी वेळीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे आणि घाट रस्त्याने प्रवास टाळावा. स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून स्वतःची व जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नजीकच्या पोलीस ठाणे, तहसील कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षाशी ०२४१-२३२३८४४, ०२४१-२३५६९४०, ११२ किंवा १०७७ या टोल-फ्री क्रमांकांवर संपर्क साधावा.

# थोडक्यात पण महत्वाचे



## राजूर ग्रामपंचायतीचा अनागोंदी कारभार; प्रवरा नदी प्रदूषित

राजूर (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील राजूर ग्रामपंचायतीच्या कथित अनागोंदी कारभारामुळे परिसरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. निकृष्ट दर्जाची कचरा कुंडी, ओला व सुका कचरा विलगीकरणाची कोणतीही व्यवस्था नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. याशिवाय, प्लास्टिक व कचऱ्याने दूषित झालेले सांडपाणी चितळवेढे येथील शेतजमिनीत सोडण्यात येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. हेच दूषित पाणी पुढे थेट प्रवरा नदीपात्रात मिसळत असल्याने नदीचे प्रदूषण वाढत असून पर्यावरणावरही विपरीत परिणाम होत आहे. दुर्गंधीयुक्त वातावरणामुळे चितळवेढे गावातील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच राजूर महाविद्यालय व नर्सिंग कॉलेज या परिसरालगत असल्याने येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. या संपूर्ण प्रकरणाची संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन कचरा व्यवस्थापनाची योग्य व्यवस्था करावी, दूषित पाण्याचा प्रवाह त्वरित बंद करावा आणि जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## आरेखक-अनुरेखक पदे कायम ठेवून तात्काळ भरतीची मागणी



- खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना इंजि. विश्वंभर पवार यांच्या शिष्टमंडळाचे निवेदन

भोकर (स. गांवकरी) : राज्यातील विविध शासकीय विभागांतील आरेखक (ड्राफ्ट्समन सिव्हिल), अनुरेखक (ट्रेसर) व तत्सम तांत्रिक पदे 'मृत संवर्ग' म्हणून घोषित न करता ती कायम ठेवावीत तसेच रिक्त पदांवरील भरती प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, अशी मागणी आरेखक व अनुरेखक उमेदवारांच्या शिष्टमंडळाने डॉ.श्रीकांत शिंदे हे नांदेड येथे आले असता दि. १ जुलै रोजी त्यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली. या शिष्टमंडळात इंजि. विश्वंभर पवार, श्याम येल्लूरे पंचाळ आणि नागेश्वर पंचाळ यांचा समावेश होता. शिष्टमंडळाने विविध शासकीय विभागांतील रिक्त पदांची सद्यस्थिती, आयटीआय आरेखक (स्थापत्य) अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या हजारो प्रशिक्षित युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नसल्याची बाब तसेच भरती प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याची गरज याकडे खासदारांचे लक्ष वेधले. निवेदनाची गांभीर्याने दखल घेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी शासन स्तरावर या विषयाचा पाठपुरावा करून या प्रश्नावर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले. या भेटीदरम्यान उमेदवारांनी आरेखक व अनुरेखक पदे कायम ठेवून तातडीने भरती प्रक्रिया सुरू करण्याची मागणी पुन्हा एकदा ठामपणे मांडली.

## महेंद्र कोसरे कर्मचाऱ्याच्या हकालपट्टीची रेखा ढवळे यांची मागणी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड येथील नागरी सेवा सुविधा केंद्र खिडकी क्र. ०१ वर कार्यरत असलेल्या एका खाजगी कंत्राटी कर्मचाऱ्याकडून येणाऱ्या अभ्यागत, विद्यार्थी आणि पालकांशी गैरवर्तन केले जात असून, त्यांची नाहक अडवणूक केली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती रेखा बाबुराव ढवळे यांनी दिनांक ७ जुलै २०२६ रोजी समितीच्या अध्यक्षांकडे रीतसर तक्रार निवेदन सादर करून संबंधित कर्मचाऱ्याची नजीकच्या जिल्ह्यात सेवा वर्ग करण्याची आणि त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, खाजगी पुरवठादार एजन्सीमार्फत कार्यरत असलेले प्रकल्प सहाय्यक महेंद्र कोसरे हे जात पडताळणीसाठी येणाऱ्या नागरिकांशी आणि त्यांच्या नातेवाईकांशी उद्धटपणे बोलतात व हुज्जत घालतात. महत्त्वाचे म्हणजे, जात दावा पडताळणी संहिता तसेच 'मानवी दिनांक' बाबत त्यांना कोणतेही सखोल ज्ञान नाही. अनुसूचित जाती आणि इतर मागास प्रवर्गासाठी आवश्यक असणाऱ्या कायदेशीर पुराव्यांबाबत विचारणा केली असता, त्यांना कोणतीही माहिती देता आली नाही. याशिवाय, कार्यालयातील वरिष्ठ लिपिक श्री. सिद्राम रणभिरकर व वरिष्ठ अधिकारी उच्च लघुलेखक मुकिंदा मुळे यांना याबाबत विचारले असता, त्यांनाही याविषयी सखोल माहिती नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अधिकारी पाठीशी घालत असल्याचा आरोप तक्रारदार रेखा ढवळे यांनी या गंभीर प्रकाराबाबत समितीच्या उपायुक्त तथा सदस्य डॉ. छाया कुंडलिकराव कुलाल यांच्याकडे विचारणा केली असता, त्या संबंधित चुका करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचे दिसून आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या भूमिकेमुळे जनसामान्यांमध्ये कार्यालयाची प्रतिमा मलिन होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# संगमनेर ब्रँड राज्यपातळीवर बदनाम करण्याचा त्यांचा डाव : सौ दुर्गाताई तांबे

## नगरपालिका निवडणुकीत सपाटून मार खाल्ल्यामुळे वैफल्यग्रस्ततेतून आरोप : सौ. दुर्गाताई तांबे

- चौकशीचे स्वागत, चौकशीतून दूध का दूध, पानी का पानी होऊन तोंडाच्या वाफा दवडणारे तोंडघाशी पडतील.



संगमनेर : (स. गांवकरी)

निळवंडे धरणातून संगमनेर शहरासाठी ऐतिहासिक थेट पाईप लाईन योजना पूर्णपणे यशस्वी ठरली आहे. यामुळे शहरवासीयांना दररोज स्वच्छ व मुबलक पाणी मिळत आहे. या योजनेला 2009 मध्ये नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन व जीवन प्राधिकरणसह सर्व विभागांच्या मंजुरी मिळाली आहे. 2009 च्या योजनेबाबत 2026 मध्ये अत्यंत खोटे व चुकीचे आरोप करून नवीन लोकप्रतिनिधी हे संगमनेर शहर व तालुक्याची राज्यात बदनामी करत आहे. या योजनेच्या चौकशीचे आम्ही स्वागत करत असून दूध का दूध और पानी का पानी होऊन खोटे आरोप करणारे तोंडघाशी पडतील, खरे तर नगरपालिका निवडणुकीमध्ये सपाटून मार खाल्ल्यामुळे ते वैफल्यग्रस्त होऊन आरोप करत असल्याची टीका माजी नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे यांनी केली आहे. संगमनेरचे नवीन लोकप्रतिनिधी यांनी विधानसभेसारख्या पवित्र सभागृहामध्ये संगमनेरची बदनामी केल्याप्रकरणी सौ दुर्गाताई तांबे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, संगमनेर शहर हे विकसित व शांततेचे शहर आहे. या शहरातील वाढती लोकसंख्या गृहीत धरून निळवंडे धरणातून ऐतिहासिक थेट पाईपलाईन योजना राबविण्यात आली. आणि ही योजना अत्यंत यशस्वी ठरली आहे. त्यामुळे शहरातील सर्व जनतेला मुबलक व स्वच्छ पाणी दररोज मिळत आहे.

5 मे 2009 रोजी प्रधान सचिव व सर्व विभागांची महाराष्ट्रातील यूआयडीएसएसएमटी योजनेसंदर्भात बैठक झाली यावेळी लोकसभा व विधानसभेच्या आचारसंहिता लक्षात घेऊन निविदा प्रक्रिया व कामे पूर्ण करण्यासाठी उपाययोजना करणे बाबत व कार्यदिश 31 जुलै 2009 पूर्वी करण्याचे स्पष्ट आदेश दिले. या आदेशानुसारच तत्कालीन मुख्याधिकारी यांनी या योजनेचे प्रकल्प सल्लागार यांची सर्व संबंधित विभागांच्या जीवन प्राधिकरणाच्या आवश्यक मंजुरी घेऊनच कार्यदिश देण्याबाबत प्रशासकीय बाबी पूर्ण केलेल्या आहेत. योजनेचे सर्व काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण झालेली असून त्यामुळे शहरातील सर्व प्रभागांना पूर्ण दाबाने पाणीपुरवठा होत आहे या कामाचे थर्ड पार्टी ऑडिट करूनच बिल अदा करण्यात आलेले आहे. याप्रमाणे सर्व विभागांच्या मंजुरी असल्याने कोणतेही चुकीचे काम झालेले नसून फक्त दिशाभूल करण्यासाठी नवीन लोकप्रतिनिधी हे आरोप करीत आहेत प्रधान सचिव नगर विकास व सर्व विभागांच्या प्रमुखांची बैठक झाली. यावेळी लोकसभा व विधानसभेची आचारसंहिता लागणार असल्याने या योजनेला तातडीने कार्यारंभ करावा अशा सूचना नगर विकास विभागाकडून देण्यात आल्या. सदर टेंडर मधील वाढीव रकमेबाबत एमजीपी व शासनाच्या विभागाकडून दुरुस्ती करून घ्यावी. अशा सूचना देण्यात आल्या. यानंतर ही दुरुस्ती करून घेऊन शासनाचे सर्व विभाग जिल्हाधिकारी व एमजीपीचे प्रमुख यांच्या वतीने ही मंजुरी देण्यात आली. या व्यतिरिक्त या पूर्ण योजनेचे बिल देताना थर्ड पार्टी ऑडिट करण्यात आले असून त्यानंतर बिल दिले आहे. यामध्ये शासनाच्या सर्व विभागांच्या पूर्ण मंजुरी आहेत कुठेही चुकीचे काही झाले नाही. मात्र संगमनेर शहर व तालुका यांची प्रगती ही संगमनेर ब्रँड म्हणून राज्यात प्रसिद्ध आहे. याचे श्रेय त्यांना कधीही मिळत नाही. याला बदनाम करण्यासाठी विधानसभेसारख्या पवित्र सभागृहांमध्ये नवीन लोकप्रतिनिधी अत्यंत चुकीच्या पद्धतीने आणि अपूर्ण माहितीच्या आधारे मांडणी करून जनतेची दिशाभूल करत आहे. आतापर्यंत शहर व तालुक्यासाठी एक रुपयाही निधी न आणता फक्त बदनामी करण्याचे काम त्यांनी केले आहे. या योजनेबाबत राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले . या चौकशीचे आम्ही स्वागतच करतो. यामुळे खोटे आरोप करणारे आणि तोंडाच्या वाफा दवडणारे लोक तोंडावर पडतील हे नक्कीच असल्याचे त्या म्हणाल्या संगमनेर नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये नवीन लोकप्रतिनिधी यांची नगराध्यक्ष पदाची घरातील उमेदवार यांनी सपाटून मार खाल्ला. याचबरोबर त्यांचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने पराभूत झाले. मूलभूत प्रश्न सोडून वेगळ्याच विषयांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी त्यांचा हा उद्योग असून संगमनेर तालुक्यातील व शहरांमधील जनतेमध्ये त्यांच्याबद्दल प्रचंड नाराजी आहे.

# झी५वरील 'फ्रेम' १० जुलैपासून

मुंबई : (स. गांवकरी)

मराठी झी५ वर १० जुलैपासून प्रदर्शित होणारा मूळ मराठी चित्रपट 'फ्रेम' प्रेक्षकांसमोर व्यावसायिक जबाबदारी आणि मानवी संवेदनशीलता यांच्यातील संघर्षाची प्रभावी कथा घेऊन येत आहे. दिग्दर्शक विक्रम पटवर्धन यांच्या लेखन-दिग्दर्शनाखाली साकारलेल्या या सामाजिक नाट्यात नागराज मंजुळे, अमेय वाघ, मुग्धा गोडसे आणि अक्षया गुरव यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पुण्यातील एका वृत्तपत्राच्या वृत्तकक्षाच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या या चित्रपटात अनुभवी छायाचित्र वार्ताहर चंदू पानसरे आणि आदर्शवादी नवोदित सिद्धार्थ देशमुख यांच्या विचारांचा संघर्ष केंद्रस्थानी आहे. "आधी छायाचित्र, मग बाकी सगळं" या भूमिकेवर ठाम असलेला चंदू आणि माणुसकी जपत पत्रकारिता करण्यावर विश्वास ठेवणारा सिद्धार्थ यांच्या प्रवासातून पत्रकारितेतील नैतिक मूल्यांचा वेध घेण्यात आला आहे. कथानकाला कलाटणी देणाऱ्या विनाशकारी भूकंपानंतर





मृत्यू, विध्वंस आणि जगण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांचे वास्तव टिपताना या दोघांसमोर कठीण प्रश्न उभे राहतात. छायाचित्र टिपायचे की मदतीसाठी धावायचे, व्यावसायिक कर्तव्याला प्राधान्य द्यायचे की मानवी मूल्यांना, अशा द्वंद्वातून चित्रपट पुढे सरकतो. संकटाच्या काळात प्रसारमाध्यमांची भूमिका, सत्याचे दस्तावेजीकरण आणि त्यासाठी मोजावी लागणारी भावनिक व नैतिक किंमत यांचे वास्तवदर्शी चित्रण या चित्रपटात करण्यात आले आहे. झी मराठीच्या मुख्य वाहिनी अधिकारी आणि मराठी झी५च्या व्यवसाय प्रमुख व्ही. आर. हेमा यांनी सांगितले की, दर्जेदार आणि विचार करायला लावणाऱ्या मराठी कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याच्या प्रयत्नातील 'फ्रेम' हा महत्त्वाचा टप्पा आहे.

# खडकवाडीजवळ भीषण अपघात; तरुणाचा मृत्यू

- एक जखमी

पारनेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील खडकवाडी शिवारात टाकळीढोकेश्वर-खडकवाडी मार्गावर झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना मंगळवारी (दि. ७ जुलै) दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधा पोपट केदार (वय २७, रा. जांभुळवाडी, खडकवाडी) आणि आयुष मनोज चिकणे हे दोघे एमएच १६ डीएफ ६५९५ क्रमांकाच्या होंडा युनिकॉर्न दुचाकीवरून टाकळीढोकेश्वरकडून खडकवाडीच्या दिशेने जात होते. समोरून येणाऱ्या एमएच १२ डब्ल्यूजे ५७९० क्रमांकाच्या टाटा टेम्पोने दुचाकीला जोरदार धडक दिली.



धडकेनंतर दुचाकीस्वार गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले. अपघाताची माहिती मिळताच नातेवाईक व ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. जखमी आयुष चिकणे याला तातडीने खासगी रुग्णवाहिकेतून अहिल्यानगर येथील न्युरॉन रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तर बुधा केदार याला टाकळीढोकेश्वर ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

या प्रकरणी मृत बुधा केदार यांचे भाऊ यांनी टाकळीढोकेश्वर पोलिस दूरक्षेत्रात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत टेम्पो चालक रविंद्र बाळासाहेब टेकवडे (रा. तरडोबाची वाडी, शिरूर, जि. पुणे) याने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडविल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच अपघातानंतर जखमींना मदत न करता चालक निघून गेल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे खडकवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत असून टाकळीढोकेश्वर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी मुसळधार पाऊस

पारनेर : (स. गांवकरी)

गेल्या दोन-तीन दिवसांपासून अकोले आणि संगमनेर तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी असलेल्या मुळा नदीच्या पाणलोट क्षेत्रात मंगळवारी (दि. ७) जोरदार बॅटिंग केली. या दमदार पावसामुळे मुळा नदीला यंदाच्या हंगामातील पहिला मोठा पूर आला आहे. नदी सध्या दुथडी भरून वाहत असून, पुराचे पाणी प्रचंड वेगाने मुळा धरणाच्या दिशेने सरकत आहे.

नदीपात्रातील पाण्याची आवक सातत्याने वाढत असल्यामुळे संगमनेर आणि पारनेर तालुक्यांना जोडणारा महत्त्वाचा मांडवे पूल पाण्याखाली जाण्याची तीव्र शक्यता निर्माण झाली आहे.

मांडवे पूल हा संगमनेर आणि पारनेर तालुक्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या मार्गावरून रोज शेकडो वाहनांची आणि नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, सध्या या पुलाखालून तब्बल १० ते १२ फूट उंचीवरून



### काही काळ पुलावरून पाणी गेले

मंगळवारी रात्री मांडवे पुलावरून पाणी गेले असून सध्या पाण्याचा प्रवाह ओसरला असला, तरी धोका टळलेला नाही. हरिश्चंद्रगडावर सातत्याने सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नदीचा जलस्तर पुन्हा वेगाने वाढून पूल कोणत्याही क्षणी पाण्याखाली जाण्याची दाट शक्यता आहे. नागरिकांनी परिस्थिती पूर्वपदावर येईपर्यंत पुलावरून प्रवास टाळावा आणि नदीकाठच्या गावांनी पूर्णपणे सतर्क राहावे. अशी माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

पाण्याचा प्रवाह वाहत आहे. मुसळधार पावसामुळे पाण्याची पातळी अत्यंत वेगाने वाढत असून, हा प्रवाह असाच सुरू राहिल्यास मांडवे पूल कोणत्याही क्षणी पाण्याखाली जाऊ शकतो. पूर आल्यास संगमनेर-पारनेर मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प होईल आणि दोन्ही तालुक्यांचा एकमेकांशी असलेला संपर्क तुटण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, मुळा नदीला आलेला हा रौद्र आणि नयनरम्य पूर पाहण्यासाठी स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनी मांडवे पुलावर प्रचंड गर्दी केली आहे. अनेक नागरिकांनी आपली दुचाकी व चारचाकी वाहने थेट पुलावरच उभी केल्यामुळे वाहतुकी कोंडी होत असून मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

पाण्याचा वेग आणि वाढती पातळी पाहता मोठा अनपेक्षित धोका निर्माण होऊ शकतो. ही संभाव्य आपत्ती लक्षात घेऊन प्रशासनाने नागरिकांना कडक इशारा दिला आहे . नागरिकांनी विनाकारण पुलावर गर्दी करू नये, वाहने थांबवून वाहतुकीला अडथळा आणू नये आणि नदीकाठच्या गावांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासकीय यंत्रणेकडून करण्यात आले आहे.

हरिश्चंद्रगड परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुळा नदीच्या जलस्तरात झपाट्याने वाढ होत आहे. मांडवे पूल कोणत्याही क्षणी पाण्याखाली जाण्याची शक्यता असल्याने नदीकाठच्या गावांनी तात्काळ सतर्क व्हावे. नागरिकांनी विनाकारण पुलावर गर्दी करू नये, तसेच नदीपात्रात किंवा पूरप्रवण क्षेत्रात उतरण्याचे धाडस करू नये. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे.

# आयटी क्षेत्रातील मनुष्यबळाच्या समस्यांवर राज्यव्यापी सर्वेक्षण



पुणे : (स. गांवकरी)

- 'व्हाईट टी-शर्ट रिव्होल्युशन'चा 'कॉर्पोरेट न्याय' उपक्रम

माहिती तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या वाढत्या समस्या, नोकरकपात, रोजगाराची असुरक्षितता तसेच मानसिक, आर्थिक आणि सामाजिक अडचणींचा अभ्यास करण्यासाठी 'व्हाईट टी-शर्ट रिव्होल्युशन' या सामाजिक संस्थेने राज्यव्यापी सर्वेक्षण अभियान हाती घेतले आहे. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून आयटी आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर धोरणात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी 'कॉर्पोरेट न्याय' हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची घोषणा बुधवारी झालेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी म्हणाले की, जगातील प्रगत देशांकडून भारतीय सॉफ्टवेअर अभियंत्यांची संख्या कमी करण्याच्या धोरणाचा परिणाम देशातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रावर होत आहे. हजारो कुटुंबांचा आधार असलेल्या या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आलेला हा उपक्रम स्वागतार्ह असून, राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी क्यूआर संकेताद्वारे उपलब्ध असलेला ऑनलाइन सर्वेक्षण अर्ज भरून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

# सततच्या पावसामुळे रस्ता खचला; ब्राम्हणवाडा-ओतूर संपर्क धोक्यात!

## PWD च्या दुर्लक्षामुळे ब्राम्हणवाडा ओतूर रस्त्याचे नुकसान; नागरिकांची तातडीच्या दुरुस्तीची मागणी!

ब्राम्हणवाडा : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा-ओतूर मार्गाची सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने (PWD) तातडीने लक्ष न दिल्यास या मार्गाचा संपर्क तुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेल्या या रस्त्याची आजची अवस्था पाहून ग्रामस्थ व वाहनचालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी आवश्यक गटारे नसल्याने सर्व पावसाचे पाणी थेट रस्त्यावरून वाहत आहे. त्यामुळे रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात धूप होत असून अनेक ठिकाणी रस्ता खचण्यास सुरुवात झाली आहे. याकडे वेळेत लक्ष न दिल्यास रस्त्याचे आणखी मोठे नुकसान होऊन वाहतूक धोकादायक बनण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या मार्गावरून दररोज एसटी बस, शालेय वाहने, दुचाकी तसेच मालवाहू ट्रकची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. अशा परिस्थितीत रस्त्याचा काही भाग खचल्यास किंवा संपर्क तुटल्यास मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः अवजड वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे धोका अधिक वाढला आहे. या गंभीर समस्येबाबत पत्रकार संजय गायकर यांनी संबंधित वृत्त प्रसिद्ध करून सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोले यांचे लक्ष वेधले आहे. संबंधित विभागाने तात्काळ पाहणी करून रस्त्यावरील पाण्याचा योग्य निचरा करण्यासाठी गटारे बांधावीत, खचलेले भाग त्वरित दुरुस्त करावेत आणि आवश्यक संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

पावसाळा अद्याप सुरू असल्याने प्रशासनाने या प्रश्नाची गंभीर दखल घेऊन तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत. अन्यथा ब्राम्हणवाडा-ओतूर मार्गावरील वाहतूक धोक्यात येण्याबरोबरच भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.



# विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेस ग्रामस्थांनी सहकार्य करावे

## मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी मंगळवार दिनांक ७ जुलै रोजी लोहा तालुक्यातील धावरी व पिंपळगाव ढगे या गावांना भेट देऊन विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) मोहिमेंतर्गत सुरू असलेल्या गणना पत्रके भरण्याच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी बूथस्तरीय अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या गृहभेटींचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

ग्रामस्थांशी संवाद साधताना मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील म्हणाले की, मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे गणना पत्रके भरण्यासाठी गृहभेटी देणाऱ्या बूथस्तरीय अधिकाऱ्यांना नागरिकांनी संपूर्ण सहकार्य करून आवश्यक ती अचूक माहिती उपलब्ध करून द्यावी. प्रत्येक पात्र नागरिकाने जबाबदारीची



जाणीव ठेवून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. गावातील युवकांनीही या मोहिमेत पुढाकार घेऊन बूथस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे. विशेषतः एकाच समाजाची किंवा समान आडनावांची कुटुंबे मोठ्या प्रमाणात असलेल्या गावांमध्ये २० ते २५ युवकांचे स्वयंसेवक गट तयार करून त्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. या गटामार्फत गृहभेटी घेऊन नागरिकांना मोहिमेची माहिती देणे, भरलेली गणना पत्रके विहित मुदतीत संकलित करणे तसेच त्यांची ऑनलाइन नोंदणी वेळेत पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. दौऱ्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल बांधकामांचीही पाहणी केली. लाभार्थ्यांशी संवाद साधून कामाच्या प्रगतीची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, गट विकास अधिकारी कुलकर्णी, नायब तहसीलदार संदीप हडगे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**इगतपुरी :** 'महाराष्ट्राचे चेरापुंजी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इगतपुरी तालुक्याला काल रात्रीपासून पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. जवळपास महिनाभर उशिराने आलेल्या पावसाने सुरुवातीला सर्वांचीच चिंता वाढवली होती; मात्र काल रात्रीपासून तालुक्यात पावसाने जोरदार धुमाकूळ घातला आहे. रात्रभर कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे आज (दि. ७) सकाळी ८ वाजेपर्यंत तब्बल २०० मिलीमीटर (द्विशतक) पावसाची नोंद झाली असून, तालुक्यात आतापर्यंत एकूण ७२९ मिमी पाऊस झाला आहे.

## थोडक्यात बातम्या...

### विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) मोहिमेस ग्रामस्थांनी सहकार्य करावे



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी आज लोहा तालुक्यातील धानोरा व पिंपळगाव ढगे या गावांना भेट देऊन विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) मोहिमेंतर्गत सुरू असलेल्या गणना पत्रके भरण्याच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी बूथस्तरीय अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या गृहभेटींचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. ग्रामस्थांशी संवाद साधताना मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील म्हणाले की, मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे गणना पत्रके भरण्यासाठी गृहभेटी देणाऱ्या बूथस्तरीय अधिकाऱ्यांना नागरिकांनी संपूर्ण सहकार्य करून आवश्यक ती अचूक माहिती उपलब्ध करून द्यावी. प्रत्येक पात्र नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. गावातील युवकांनीही या मोहिमेत पुढाकार घेऊन बूथस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे. विशेषतः एकाच समाजाची किंवा समान आडनावांची कुटुंबे मोठ्या प्रमाणात असलेल्या गावांमध्ये २० ते २५ युवकांचे स्वयंसेवक गट तयार करून त्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. या गटामार्फत गृहभेटी घेऊन नागरिकांना मोहिमेची माहिती देणे, भरलेली गणना पत्रके विहित मुदतीत संकलित करणे तसेच त्यांची ऑनलाइन नोंदणी वेळेत पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. दौऱ्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल बांधकामांचीही पाहणी केली. लाभार्थ्यांशी संवाद साधून कामाच्या प्रगतीची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, गट विकास अधिकारी कुलकर्णी, नायब तहसीलदार संदीप हडगे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### 'महा-उपलब्धी' ॲप कार्यान्वित; सर्व सेवांसाठी वापराचे आवाहन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनासंबंधित विविध माहिती व सेवा एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी 'महा-उपलब्धी (MAHA UPLABDHI)' हे मोबाईल ॲप उपलब्ध करून देण्यात आले असून, १ जुलै २०२६ पासून ते कार्यान्वित करण्यात आले आहे. या ॲपचा सर्व निवृत्तीवेतनधारकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती शोभा मुंढे यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या १६ जून २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विकसित करण्यात आलेल्या या ॲपच्या माध्यमातून निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनाशी संबंधित विविध डिजिटल सेवा सुलभ, जलद आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या ॲपमध्ये मासिक निवृत्तीवेतनाचा तपशील, महागाई भत्त्याचा फरक, आयकर कपात दाखला (फॉर्म क्र. १६), उत्पन्नाचा दाखला (Income Certificate), तसेच निवृत्तीवेतन विषयक शासन निर्णय यांसारख्या महत्त्वाच्या सेवा उपलब्ध आहेत. त्यामुळे संबंधितांना कोषागार कार्यालयात वारंवार प्रत्यक्ष भेट देण्याची आवश्यकता मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

### पहाटे २ वाजेपासून ओतूर परिसरात अतिवृष्टी; जनजीवन विस्कळीत

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर परिसरात बुधवारी पहाटे सुमारे २ वाजल्यापासून मुसळधार पावसाने हजेरी लावली. सलग सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे नदी-नाले, ओढे दुथडी भरून वाहू लागले असून सखल भागात पाणी साचल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. रात्रभर सुरू असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी शेतामध्ये पाणी साचले असून पिकांचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. ग्रामीण भागातील काही अंतर्गत रस्त्यांवर पाणी आल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. तर ओढ्यांना आलेल्या पुरामुळे नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. हवामान विभागाने पुढील काही तासांतही जोरदार पावसाची शक्यता वर्तविल्याने नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये, पूरग्रस्त ठिकाणी जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, सतत सुरू असलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून पावसाची तीव्रता कायम असल्याने नागरिकांमध्ये सतर्कतेचे वातावरण आहे.

### ठुणे येथे डोईफोडी नदीला महापूर

मुरबाड (स. गांवकरी) : मुरबाड तालुक्यातील ठुणे गावाजवळील डोईफोडी नदीला आलेल्या महापुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नदीवरील केटी बंधाऱ्यामुळे पुराचे पाणी अडून ते शेजारच्या शेतजमिनी व वस्त्यांमध्ये शिरत असल्याने दरवर्षी शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असल्याची तक्रार स्थानिक शेतकरी ज्ञानेश्वर मुरबाडे यांनी केली आहे. यंदाच्या मुसळधार पावसामुळे डोईफोडी नदीला मोठा पूर आला. या पुराचे पाणी ज्ञानेश्वर मुरबाडे यांच्या शिवराज बंगला परिसरात शिरल्याने मालमत्तेचे नुकसान झाले. तसेच त्यांनी केलेली भातशेती पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. केटी बंधाऱ्यामुळे नदीचे पाणी अडून शेतजमिनीत घुसत असल्याने या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रवेशद्वारावर अंधाराचे साम्राज्य

## पथदिवे बसविण्याची लोकधारा प्रतिष्ठानची मागणी; रुग्ण व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारासह परिसरात रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य पसरत असल्याने रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य केंद्र परिसरात तसेच मुंबई–नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वरील सर्व्हिस रोडलगत तातडीने पथदिवे बसविण्याची मागणी लोकधारा प्रतिष्ठानने पडघा ग्रामपंचायत व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील मुंबई–नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वरील सर्व्हिस रोडवरून गावात प्रवेश करण्यासाठी महत्त्वाचे वळण आहे. या मार्गावर दिवसरात्र




मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. मात्र, या ठिकाणी पथदिव्यांची कोणतीही प्रभावी व्यवस्था नसल्याने रात्री संपूर्ण परिसर अंधारात बुडतो. परिणामी वाहनचालक, पादचारी तसेच रुग्णवाहिकांना ये-जा करताना मोठ्या धोक्याला सामोरे जावे लागत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. पडघा प्राथमिक आरोग्य केंद्र हे परिसरातील हजारो नागरिकांसाठी महत्त्वाचे आरोग्य केंद्र असून येथे चोवीस तास रुग्णांची ये-जा सुरू असते. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका, खासगी वाहने तसेच पायी येणाऱ्या नागरिकांची सतत वर्दळ असते. त्यामुळे आरोग्य केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारापासून राष्ट्रीय महामार्गावरील सर्व्हिस रोडच्या वळणापर्यंत तसेच संपूर्ण परिसरात उच्च क्षमतेचे पथदिवे तातडीने बसविण्यात यावेत, अशी मागणी लोकधारा प्रतिष्ठानने केली आहे. वेळेत पथदिव्यांची उभारणी झाल्यास अपघातांना आळा बसण्यास मदत होईल. तसेच रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह नागरिकांना सुरक्षित आणि सुलभ प्रवास करता येईल, असा विश्वास लोकधारा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी व्यक्त केला.

# हलगर्जीपणामुळे बालिकेचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

■ अभियंता, ठेकेदारासह चौघांविरुद्ध कोतवालीत गुन्हा दाखल

नगर शहरातील आनंदनगर भागात महावितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे एका १० वर्षीय बालिकेचा विजेच्या धक्क्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी दि. ६ जुलै रोजी दुपारी घडली. या प्रकरणी महावितरणचे अभियंता, ठेकेदारासह चौघांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आनंदनगर भागात खेळत असताना चिमुरडीचा हात महावितरणच्या उघड्या विजेच्या खांबाला लागला. खांबामध्ये विद्युत प्रवाह उतरलेला असल्याने तिला जोरदार शॉक बसला आणि त्यातच तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी महावितरण कार्यालयात धडक आंदोलन केले. संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनानंतर महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता भास्कर सिताराम कोळे (वय ५५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कर्तव्यात कसूर करून निष्काळजीपणा दाखवल्यामुळे या बालिकेचा मृत्यू झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. आमदार जगताप यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतरच कंपनीने गुन्हा दाखल करण्याची भूमिका घेतली.

# प्रश्नांकडे तातडीने लक्ष द्यावे

## बाळासाहेब सोनवणे

नाशिक : (स. गांवकरी)

महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या विविध न्याय्य व प्रलंबित मागण्यांसाठी दि. ९ जुलै २०२६ रोजी राज्यभर पुकारण्यात आलेल्या सामूहिक शाळा बंद आंदोलनास महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचा जाहीर पाठिंबा असल्याची घोषणा संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांनी केली आहे. शिक्षकांना सातत्याने बीएलओ (BLO), एसआयआर (SIR), जनगणना, निवडणूक तसेच इतर अशैक्षणिक कामांमध्ये गुंतविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर गंभीर परिणाम होत आहे. शिक्षकांचे मुख्य कर्तव्य अध्यापन असून त्यांना अशैक्षणिक कामांत अडकविण्याऐवजी शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शासनाने प्राधान्य द्यावे, अशी संघटनेची भूमिका आहे. यावेळी दिव्यांग शिक्षक, कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधताना श्री. सोनवणे यांनी सांगितले की, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ तसेच शासनाच्या स्पष्ट निर्देशांनुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना बीएलओ, जनगणना, निवडणूक यांसारख्या अतिरिक्त कामांतून वगळणे अपेक्षित असतानाही अनेक ठिकाणी या सूचनांचे पालन होत नाही. तसेच सन २०१६ पासून पदांची परिगणना करून दि. २९ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार



दिव्यांग आरक्षण,सेवा ज्येष्ठता व पदोन्नतीची अंमलबजावणी करून पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती द्यावी, अशी संघटनेची मागणी आहे. याशिवाय दिव्यांग आरक्षणाची शंभर टक्के अंमलबजावणी, पदोन्नतीतील प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढणे, दिव्यांग कर्मचाऱ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार पदस्थापना देणे, आवश्यक सहाय्यक साधने व सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच सर्व शासकीय कार्यालये व शैक्षणिक संस्था दिव्यांगांसाठी पूर्णपणे सुलभ करण्याबाबत प्रभावी कार्यवाही करावी, अशीही मागणी संघटनेने केली आहे.

# दैनिक समर्थ गांवकरीच्या पाठपुराव्याला यश

## खैरणे एमआयडीसीतील धोकादायक खुल्या चेंबर्सवर बसविले नवीन कव्हर्स!

नवी मुंबई : (स. गांवकरी)

नवी मुंबईतील खैरणे एमआयडीसी परिसरात सत्कार हॉटेलच्या बाजूला अनेक चेंबर्स काही दिवसांपासून खुल्या अवस्थेत असल्याने कामगार, वाहनचालक व नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. या धोकादायक परिस्थितीमुळे कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दैनिक समर्थ गांवकरीचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांनी संबंधित खुल्या चेंबर्सची रांगोळी काढून व फुले अर्पण करून अनोख्या पद्धतीने प्रतीकात्मक आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल घेत दैनिक समर्थ गांवकरीनेही सातत्याने पाठपुरावा केला.



या पाठपुराव्याला अखेर यश आले असून संबंधित प्रशासनाने तातडीने कारवाई करत सत्कार हॉटेललगत असलेल्या सर्व खुल्या चेंबर्सवर नवीन मजबूत कव्हर्स बसविले आहेत. त्यामुळे परिसरातील कामगार, वाहनचालक आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून संभाव्य अपघाताचा धोका टळला आहे.



याबद्दल दैनिक समर्थ गांवकरी तर्फे नवी मुंबई महानगरपालिका, एमआयडीसी प्रशासन तसेच संबंधित कंत्राटदार यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित समस्यांवर भविष्यातही प्रशासनाने अशीच तत्परता दाखवत त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

# मुसळधार पावसाने घरांवर भुस्कलनाचे संकट

## ८ ते १० कुटुंबांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

इगतपुरी : (स. गांवकरी)

इगतपुरी तालुक्यातील भाम धरणाच्या मागे असलेल्या मांजरगाव परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे घरांच्या खालील माती मोठ्या प्रमाणात वाहून गेल्याने अनेक घरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

गेल्या २४ तासात जवळपास २०५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जमिनीची धूप झाल्यामुळे घरांना धोका निर्माण झाला आहे. तहसीलदार अभिजीत बारवकर यांनी तातडीने गावातील सुमारे ८ ते १० कुटुंबांना तातडीने सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. या कुटुंबांतील जवळपास ३९ नागरिकांना प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तात्पुरता निवारा उपलब्ध करून दिला आहे. घटनेची माहिती मिळताच महसूल व स्थानिक प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक उपाययोजना सुरू केल्या आहेत.



घटनेची माहिती मिळताच आदिवासी विकास परिषद राष्ट्रीय युवा अध्यक्ष लकी जाधव यांनी घटनास्थळी भेट देऊन या नागरिकांना सर्व सुख सुविधा मिळाव्या या करिता तहसीलदार अभिजीत बारकर यांना विनंती केल्यावर तहसीलदारांनी तत्काळ तेथे संरक्षक भिंत बांधण्याचे आश्वासन दिले असून सध्या त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली आहे. यावेळी लकी जाधव यांनी बोलतांना सांगितले की, आमदार हिरामण खोसकर यांनी या तालुक्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांना शहरात जायला वेळ आहे मात्र ग्रामीण भागात जायला वेळ नाही. तहसीलदार आणि पोलिसांचे मी आभार मानतो त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून लोकांना वाचविण्याचे काम केले आहे.

तसेच घोटी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांनी गेल्या दोन दिवसांपासून परिस्थितीवर नियंत्रण ठेवुन येथील पिडीत कुंटुबाला धीर दिला आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. मात्र सतत सुरू असलेल्या पावसामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण असून, धोकादायक ठरलेल्या घरांची पाहणी करून आवश्यक ती मदत व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)



# माऊलींचे पालखी सोहळ्याचे नामजयघोषात प्रस्थान

## पंढरीची वारी आहे माझे घरी ! आणिक न करी तीर्थव्रत !!

## संपदा सोहळा नावडे मनाला ! लागला टकळा पंढरीचा !!

## हजारो वारकऱ्यांची उपस्थिती; श्रींचे चलपादुका पालखीची मंदिर प्रदक्षिणा

- अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र, जेथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र.
- महिलांसह पुरुषांनी फूगड्या खेळत समानतेचा संदेश देत प्रस्थान सोहळ्यातील वारीत पावले खेळली.
- अश्वांचे माऊली मंदिरात सव्वा चारचे सुमारास आगमन झाले.
- इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहते. भाविकांची मर्यादित गर्दी सह नदीला महापूर
- श्रींचे वैभवी दर्शनासह मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावट
- नगरप्रदक्षिणा मार्गावर दिंड्यांचा हरिनाम गजर
- प्रदक्षिणा मार्गावर वाहनाची रहदारी कायम
- आळंदीतील पूल रहदारीला बंद ; तत्काळ नियोजनाचा अभाव
- आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाजावर प्रश्नचिन्ह
- माऊली मंदिरात भक्तिमय उत्साहात नामजयघोष
- श्रींचे अश्वांचे स्वागतास प्रस्थान दिनी रेड कार्पेट
- महिलांसह पुरुषांनी फूगड्या खेळत समानतेचा संदेश.

आळंदी : (स. गांवकरी)

**वारकरी संप्रदायाचे प्रतीक गळ्यात तुळशीमाळ, हातात भगव्या पताका, मुखाने हरिनामाचा गजर करीत लाखो भावीकांचे उपस्थितीत पोलीस बंदोबस्तात माउलींच्या पालखीचे प्रस्थान भक्ती मार्गाचे दैवत श्री विठ्ठल भगवान पांडुरंगाचे दर्शन आणि वारीला जाण्यास माउली मंदिरातील विना मंडपातून बुधवारी ( दि. ८ ) हरिनाम गजरात सायंकाळी सव्वा सहाचे सुमारास झाले. प्रस्थानला लाखो वारकरी भाविकांची गर्दी रोखण्यासाठी राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासन यांनी प्रयत्न केले. या साठी प्रशासनाने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. या मुळे मर्यादित वारकरी, भाविकांचे उपस्थितीत श्रींचे पालखी सोहळ्याने प्रस्थान हरिनाम गजरात ठेवले. या वेळी आळंदीकर ग्रामस्थ युवक तरुणांनी श्रींची पालखी खांद्यावर घे, नाचवित माऊली माऊली जयघोष केला.**

श्रींचे प्रस्थान प्रसंगी धर्मादाय सह आयुक्त दिनेश कोथळीकर, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, आमदार महेश लांडगे, पुणे जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, मुख्याधिकारी माधव खांडेकर, प्रांत अनिल दौन्डे, पोलीस निरीक्षक भीमा नरके, माजी विरोधी पक्ष गटनेते डी.डी.भोसले पाटील, डॉ. राम गावडे



पाटील, उर्जितसिंह शितोळै सरकार, महादजी शितोळे सरकार, पालखी सोहळा प्रमुख अँड राजेंद्र उमाप, प्रमुख विश्वस्त डॉ भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, पुरुषोत्तम महाराज पाटील, चैतन्य महाराज लोंढे कबीरबुवा, रोहिणी पवार, बैल निवड समिती अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, माजी उपनगराध्यक्ष नंदकुमार कुऱ्हाडे, पालखी सोहळा मालक राजेंद्र बाळासाहेब आरफळकर, ऋषिकेश राजेंद्र आरफळकर, पोलीस नाईक मच्छिन्द्र शेंडे, श्रींचे सेवक चोपदार बाळासाहेब रणदिवे, राजाभाऊ चोपदार, मानकरी माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर, बाळासाहेब कु-हाडे, योगेश आरु, स्वप्नील कु-हाडे, फडकरी, दिंडीकरी, मानकरी यांचे उपस्थितीत झाले. प्रस्थान दिनी श्रींचे पूजेचे पौरोहित्य आळंदीतील श्रींचे पुजारी क्षेत्रोपाध्ये यांनी केले. या वर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने आळंदीतील पुलांचे कठडे महापुराचे पाण्यात वाहूंन गेले. आळंदीतील महापुराने नागरी सेवा सुविधा कोलमडल्या. पिण्याचे पाण्यापासून थेट निवाऱ्या पर्यंतच्या समस्यां निर्माण झाल्याने प्रशासनाने आळंदीकडे भाविक कसे येणार नाहीत या साठी यंत्रणा राबविली. तरीही आळंदीत लाखावर भाविकांची उपस्थिती शहर परिसरात प्रस्थांन साठी होती. श्रींचा प्रस्थान सोहळा मात्र मर्यादित भाविकांचे उपस्थितीत झाला. प्रस्थानला लाखो वारकरी भाविकांची गर्दी रोखण्यासाठी राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासन यांनी प्रयत्न केले. झाल्याने प्रशासनाने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. वारकरी, भाविकांचे उपस्थितीत श्रींचे पालखी सोहळ्याने प्रस्थान ठेवले.

### अलंकापुरीत प्रदीर्घ वेळे नंतर श्रींचे अश्व आळंदीत प्रवेशले; परंपरांचे अखेर पालन

श्रींचे अश्व आळंदीत आणण्यास देखील प्रचंड विलंब लावला. या मुळे देखील अनेकांत नाराजी राहिली. आळंदी ग्रामस्थ पदाधिकारी माजी नगराध्यक्ष राहुल चितळकर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, पालखी सोहळ्याचे मालक राजेंद्र आरफळकर, अश्व सेवा मानकरी मालक उर्जितसिंह शितोळे सरकार, महादजीराजे शितोळे सरकार यांनी आळंदी देवस्थांनशी संवाद ठेवत रात्री उशिरा मंगळवारी ( दि. ७ ) श्रींचे अश्व

### पाहुणचारास सोहळा गांधी वाड्यात विसावला

मंदिरात प्रवेशले. आळंदी देवस्थान तर्फे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख राजेंद्र उमाप, विश्वस्त रोहिणी पवार, योगी निरंजन नाथ, पुरुषोत्तम पाटील, चैतन्य लोंढे कबीरबुवा, व्यवस्थापक माउली वीर यांनी स्वागत करीत अश्व पूजा केली. त्या नंतर कारंजा मंडपातून श्रींचेअश्वानी दर्शन घेत मंदिर प्रदक्षिणा करीत मुक्काम स्थळी रात्री उशिरा पोहोचले. शितोळे सरकार आणि पालखी सोहळा मालक यांनी प्रथा परंपरांचे पालन करण्याची ठाम भूमिका घेत



श्रद्धा जोपल्साल्या. अलीकडील काळात परंपरांना तडा लावण्याचे काम केले जात आहे. ते षडयंत्र मात्र या वर्षी धुळीस मिळवले गेले.

**सोहळ्याचे थेट प्रक्षेपण सेवेने गर्दी वर उपाय :** आळंदी देवस्थानने प्रस्थान सोहळा थेट प्रक्षेपण व्यवस्था केल्याने लाखो भाविक, नागरिकांना सोहळा आपापल्या घरात राहून सुरक्षित पणे पाहता आला. आनंदवारी सोहळ्याचा आनंद घेण्याची पर्वणी या मुळे नागरिक, भाविक यांना लाभली. मात्र दिंडीकरी आणि खांदेकरी यांचे मंदिर प्रवेशाचे संख्येवर नियंत्रण आणल्याने ग्रामस्थ आणि दिंडीतील वारकरी यांच्यात मोठी नाराजी राहिली. मंदिरात प्रवेश करण्याचे कारणावरून पोलीस आणि वारकरी यांच्यात किरकोळ वादावादी झाली. यावेळी पोलिसांनी गर्दीवर नियंत्रण मिळविण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. वारकरी यांनी सुरक्षा कठडे ओलांडून प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. यावेळी किरकोळ वादंग झाले. माउली मंदिर परिसरातील रस्ते पोलीस प्रशासनाने भाविकांना येण्यास रोखल्याने भाविकांना थेट कळस व मंदिर प्रदक्षिणा करता आली नाही. येथील भागीरथी नाला मार्गावर अस्वच्छता, राडा रोडा आणि स्वच्छता प्रभावी नसल्याने भाविकांची गैरसोय झाली. नाल्यातून पाणी वाहिन्या ऐवजी नाल्यावरुन पाणी वाहिले जात असल्याने गैरसोयीच्या वाढ झाली. मंदिर परिसरातील राम घाट, दगडी दोन घाट, शनी मारुती मंदिर मार्ग, भागीरथी नाला मार्ग वापरावर मर्यादा आल्याने इतर मार्गावर भाविक आले. मात्र भाविकांना येथून देखील पुढे जाण्यास मर्यादा आणल्याने नाराजीचा वाढ झाली. मंदिर परिसरात प्रस्थान दिनी पोलिसानांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आळंदी परिसरात होत असलेल्या पावसाने परिसरातील रस्ते आळंदीत येण्यास बंद ठेवण्यात आल्याने वारकरी दिंड्याची गैरसोय झाली. इंद्रायणी नदीचे पाणी नदीचे पाणलोट आणि लाभ क्षेत्रात वाढत असल्याने प्रशासनाने दक्षता घेण्याचे आवाहन केले. या मुळे अनेकांनी एस टी. स्टॅन्ड येथील निवारा शेडचा सहारा शोधला. तिथे पुरेशा प्रमाणात नागरी सेवा सुविधा देण्यात आल्या. संततधार पावसाचे सरीत प्रस्थान सोहळा उत्साही आनंददायी वातावरणात झाला.श्रींचे सोहळ्यातील प्रथा परंपरांचे पालन करीत मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. यात पहाटे घंटानाद, काकडा, पवमान अभिषेख, श्रींचे संजीवन समाधी दर्शन, मंदिर स्वच्छता, प्रस्थान दिनी मंदिर परिसरात केलेली लक्षवेधी पुष्पसजावट भाविकांनी पहात सोहळा अनुभवाला. आळंदीतील नगरप्रदक्षिणा मार्गावर भाविकांच्या दिंड्यानी प्रदक्षिणा करीत सोहळ्यास हजेरी लावली. या वर्षी पालखी सोहळ्यातील पावसाने परिसरात मोठी तारांबळ उडाली मात्र अनेकांनी आपली सोहळ्यातील हजेरी लावत सेवा कायम रुजू करीत उपस्थिती ठेवली. प्रस्थान सोहळ्याचे नियोजन या वर्षी थेट वरिष्ठांचे हस्तक्षेपात झाले. गर्दी वाढेल या शक्यतेने पोलीस बंदोबस्त मोठा तैनात करीत स्थानिक नागरिकांना रहदारीला गैरसोय झाल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली. प्रशासनाने पुरेशी दक्षता व काळजी घेत महसूल व पोलीस प्रशासनाने नियोजन करून आळंदी देवस्थान सोहळ्यातील संबंधित घटकांना विश्वासात घेऊन प्रस्थान पार पडले. प्रशासनास आळंदीकर नागरिक व भाविकांनी ही मोठा प्रतिसाद दिल्याने गर्दीवर नियंत्रण मिळविता आले. यासाठी पोलीस प्रशासनाने शहरात चोख बंदोबस्त लावला. यासाठी वाहतूक पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी प्रभावी नियोजन केले. मात्र काही वारकरी आणि स्वयंसेवक यांना सेवेच्या कार्यकाळात पोलीस प्रशासनाने गैरसोयीची वागणूक दिल्याने सेवकांमध्ये नाराजी राहिल्याचे नागरिकांनी सांगितले.

अलंकापुरीत प्रस्थान सोहळ्या पूर्वी परंपरांचे पालन करीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात मंदिरात पहाटे काकडा आरती, पवमान अभिषेक झाला. मंदिरात भाविकांना दर्शनास दुपार पर्यंत सोय करण्यात आली होती. श्रींचे संजीवन समाधी दर्शनास भाविकांनी गर्दी केली.

दरम्यान नऊ वाजता वीणा मंडपात परंपरेने कीर्तन सेवा झाली. दुपारी परंपरेने मंदिरात श्रीनां महानैवेद्य झाला. मंदिरात सेवेकरी व स्वकाम सेवक यांनी स्वच्छता स्वयंसेवक यांचे माध्यमातून सेवा रुजू केली. मंदिर प्राकार व श्रींचा गाभारा प्रस्थानपूर्व स्वच्छ करण्यात आला. सेवाभावीवृत्तीने सेवकांनी आपली सेवा रुजू केली.

पालखी पायी वारी सोहळा असल्याने सोहळ्यातील इतर कार्यक्रम हरिनाम गजरात झाले. सोहळ्यास यावर्षी परंपरेने दुपारी सुरुवात झाली. दरवर्षी प्रस्थान दिनी दुपारी दोन ते तीनच्या सुमारास श्रींचे रथापुढील आणि रथामागील मानाच्या ४७ दिंड्यांतील मर्यादित भाविकांना मंदिरातील देऊळवाड्यात सोहळ्यातील परंपरे प्रमाणे चोपदार यांचे सूचनां प्रमाणे प्रवेश देण्यात आला. यावर्षी दिंड्या व संबंधित दिंडी प्रमुख, वारकरी घटकांचे स्थानिक प्रतिनिधी यांना देखील मर्यादित स्वरूपात प्रवेश देण्यात आला. दरम्यान श्रींचे मंदिरात माउलींच्या समाधीवर ११ ब्रह्मवृंदाच्या वतीने श्रीनां वैभवी पोशाख झाल्यावर श्री गुरू हैबतरावबाबांच्या वतीने माउलींच्या समाधीची परंपरेने आरती हरिनाम गजरात झाली. त्यानंतर आळंदी देवस्थान तर्फे श्रींची आरती झाली. दरम्यान श्रींचे वैभवी चांदीचे पादुका पालखी प्रस्थानासाठी पुष्प सजावटीने सजलेल्या पालखी चौथ-या वर वीणा मंडपात ठेवण्यात आल्या. श्रींचे चलपादुकांची विधिवत प्राण प्रतिष्ठापना संस्थान तर्फे वेदमंत्र जयघोषात झाली. या वेळी सोहळ्यातील नियमा प्रमाणे आळंदी संस्थानच्या वतीने मानकऱ्यांना पागोटे वाटप, श्रीगुरू हैबतरावबाबांच्या वतीने दिंडी प्रमुखांना पालखी सोहळ्याचे मालक राजेंद्र आरफळकर, बाळासाहेब आरफळकर यांचे हस्ते नारळ प्रसाद वाटप झाले. श्रींचे संजीवन समाधी गाभाऱ्यात आळंदी देवस्थान च्या वतीने परंपरेने मानकरी यांना नारळ प्रसाद देण्यात आला. परंपरेने धार्मिक उपक्रम होताच श्रींचे चलपादुका देवस्थान तर्फे पालखी सोहळ्याचे मालक राजेंद्र व बाळासाहेब आरफळकर यांचे कडे देण्यात आल्या. मालक आरफळकर यांचे नियंत्रणात श्रींचे पादुका पालखीतून मंदिर प्रदक्षिणा हरिनाम गजरात झाली. श्रींचे वैभवी चलपादुका मालकांकडे हरिनाम गजर करीत पालखीत विधिवत पूजा झाली. श्रींची पालखी आळंदीकर ग्रामस्थ यांनी माऊली माऊली असा नामजयघोष करीत खांद्यावर उचलीत वारीला जाण्यास वीणा मंडपातून पंढरी कडे हरिनाम गजरात प्रस्थान ठेवले. या वर्ष ठराविक मान्यवरांना दिंडीतुन प्रवेश देण्यात आला.

माऊलींचे पादुकां पालखीची हरिनाम गजरात मंदिर प्रदक्षिणा झाल्या नंतर श्रींचे पादुका पालखी सोहळा आजोळघरा लगतच्या जुन्या रामवाड्याचे गांधी वाड्यात दर्शनबारी सभागृहात हरिनाम गजरात आणण्यात आल्या. येथे सोहळ्यातील परंपरांचे पालन करीत समाज आरतीने श्रींचा वैभवी सोहळा विसावला. आळंदीत यावर्षी पहिला एक मुक्काम होत श्रींची पालखी पुढील दोन दिवसांचे मुक्कामासाठी पुण्यनगरीकडे गुरुवारी सकाळी ( दि. ९ ) मार्गस्थ होईल. यावर्षी इंद्रायणी नदीला आलेल्या महापुराने पालखीचा पुण्यनगरीकडे जाण्याचा मार्ग बदलण्यात येत आहे. चऱ्होली खुर्द मार्गे सोहळा पुढे मार्गस्थ होणार असल्याचे देवस्थानने जाहीर केले आहे. पायी वारी असल्याने मर्यादित स्वरूपाची भाविकांची सोहळ्यास उपस्थिती राहिली. आळंदी देवस्थान ने श्रींचे सोहळ्याचे थेट प्रक्षेपण व्यवस्था केल्याने घरी राहून लाखो नागरिकांना सोहळा पाहता आला. यावर्षी श्रींचे पालखीची मंदिर प्रदक्षिणा, ग्राम प्रदक्षिणा हरिनाम जय घोषात झाली. आळंदी मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावट लक्षवेधी होती. नदी घाटावर देहू आळंदी विकास समितीचे वतीने या वर्षी कोणतेही लोकशिक्षणपर कार्यक्रम झाले नाहीत. थेट प्रक्षेपण असल्याने नागरिकांनी घरात राहून पालखी सोहळ्याचा आनंद लुटला. आळंदी मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावटने भाविकांची दाद घेतली.

या वर्षीआळंदीतून पालखी चऱ्होली खुर्द मार्गे पुण्याकडे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा मार्ग बदलण्यात आला असल्याचे आळंदी देवस्थान ने पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना काळवीट चऱ्होली खुर्द रस्त्याचे देखभाल दुरुस्तीची मागणी केले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान नंतर पहिला मुक्काम आळंदी येथील आजोळतर गांधी वाड्यातील दर्शन बारी येथे झाल्यावर गुरुवारी ( दि.९ ) सकाळी पुण्यनगरीकडे हरिनाम गजरात निघेल. आळंदीतील दोन्ही पुलां वरून पाण्याचा प्रवाह बंद झाला आहे. मात्र पुलांची परिस्थिती चांगली नसल्याचे देवस्थानने सांगितले आहे. त्यामुळे माऊलींच्या पालखीचा मार्ग बदलण्याचा निर्णय आळंदी देवस्थान ट्रस्टने घेतला आहे. या वर्षी नवीन मार्ग आळंदी येथून चऱ्होली खुर्द ते दाभाडे सरकार चौक या मार्गाने पुढे चऱ्होली बुद्रुक मार्गे चऱ्होली फाटा आणि पुढे आळंदी पुणे मार्गाने पालखी सोहळ्याचे पायी वारी प्रवास होईल. असे देवस्थाने निर्णय घेत कळविले आहे.

दाभाडे सरकार चौक आणि चऱ्होली खुर्द येथील पुलाच्या दोन्ही बाजूचे खड्डे बुजवण्याचे आदेश अधिकाऱ्यांना सूचना देत देवस्थानने मागणी केली आहे. तिथे प्रत्यक्ष भेट देऊन काम लवकर पूर्ण करण्यासह पालखी साठी रस्त्याची रुंदी वाढविण्यास आळंदी देवस्थानने मागणी केली असल्याचे पत्र पुणे जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

**आळंदीत प्रस्थान सोहळ्या येता न आल्याची भाविकांची खंत प्रस्थान दिनी प्रस्थान सोहळ्यास उपस्थित राहता न आल्याने अनेक भाविकांनी खंत व्यक्त केली. मात्र पुण्यापासून पुढे सोहळ्यात सहभागी होऊन आनंदवारी अनुभवणार असल्याचे सांगितले.**

- अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र, जेथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र.
- इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहते. भाविकांची मर्यादित गर्दी सह नदीला महापूर
- पुलाचे कठडे दुरुस्तीला वेग
- श्रींचे वैभवी दर्शनासह मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावट
- नगरप्रदक्षिणा मार्गावर दिंड्यांचा हरिनाम गजर
- प्रदक्षिणा मार्गावर वाहनाची रहदारी कायम
- आळंदीतील पूल रहदारीला बंद ; तत्काळ नियोजनाचा अभाव; आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाजावर प्रश्नचिन्ह
- माऊली मंदिरात भक्तिमय उत्साहात नामजयघोष
- माऊली मंदिरात प्रस्थान सोहळ्यात तसेच प्रदक्षिणा मार्गावर उर्वरित दिंड्यांचा नाम जयघोष
- अलंकापुरीत ज्ञानोबा तुकाराम नामजयघोषात माऊलींचे पालखी सोहळ्याचे प्रस्थान
- इंद्रायणी नदीला महापूर ; भाविकांचे स्थान महात्म्य स्नान स्वप्न भंगले

# थोडक्यात पण महत्वाचे



## कल्याण तालुक्यातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

कल्याण (स. गांवकरी) : कल्याण तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. मे महिन्याच्या २९ आणि ३० तारखेला पेरणीयोग्य पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने भात पेरणी पूर्ण केली होती. मात्र १ जुलैपासून सुरू झालेल्या संततधार पावसाने अनेक शेतांमध्ये पेरलेले बियाणे वाहून गेले, तर उगवलेली भाताची रोपे पाण्यात बुडून कुजल्याने मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी अतिरिक्त खर्च करून नवीन भात बियाणे खरेदी करत गादीवाफ्यावर रोपांची तयारी केली होती. परंतु सततच्या पावसामुळे ही रोपेही कुजून गेल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. आता पुनर्लागवडीसाठी आवश्यक रोपे उपलब्ध नसल्याने अनेक शेतकरी हतबल झाले आहेत. तसेच बाजारात भात बियाण्याचाही तुटवडा जाणवत असल्याने दुबार पेरणी करणे कठीण बनले आहे. यामुळे यंदाच्या खरीप हंगामातील भात पिकालाच मुकावे लागेल की काय, अशी भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. पोई गावातील शेतीनिष्ठ शेतकरी गुरुनाथ सांबरे यांनी तहसील प्रशासन व कृषी विभागाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत, बियाणे आणि आवश्यक दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे. दरम्यान, ओझर्ली गावातही पुराच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतांचे मोठे नुकसान झाले असल्याची माहिती शेतकरी बळीराम फिरगणे यांनी दिली. सामाजिक कार्यकर्ते भरत दळवी यांनी आपल्या मुरबाड विधानसभा मंचच्या माध्यमातून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी संबंधित प्रशासकीय कार्यालयात अर्जासह नुकसानीचे छायाचित्रे सादर करून शासनाकडे मदतीची मागणी करावी, असे आवाहन केले आहे.



## मुसळधार पावसाने मांजरगावात घरांवर संकट

इगतपुरी (स. गांवकरी) : इगतपुरी तालुक्यातील मांजरगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक ठिकाणी जमिनीची मोठ्या प्रमाणात धूप झाली आहे. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे काही घरांच्या खालील माती वाहून गेल्याने घरांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने खबरदारीचा उपाय म्हणून गावातील सुमारे ८ ते १० कुटुंबांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले. या कुटुंबांतील सुमारे ३९ नागरिकांना गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तात्पुरता निवारा देण्यात आला आहे. प्रशासनाकडून त्यांच्या निवास, अन्न व इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था करण्यात आली असून नागरिकांना सुरक्षित ठिकाणी राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. घटनेची माहिती मिळताच महसूल विभाग, ग्रामपंचायत व स्थानिक प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी धोकादायक ठरलेल्या घरांची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला असून सतत बदलणाऱ्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर परिसरावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. आणखी पाऊस झाल्यास आवश्यकतेनुसार इतर कुटुंबांचेही स्थलांतर करण्यात येईल, अशी तयारी प्रशासनाने ठेवली आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. मात्र घरांच्या पाया खालची माती वाहून गेल्याने अनेक कुटुंबांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सततच्या पावसामुळे आणखी घरे धोक्यात येण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. धोकादायक घरांची तातडीने तपासणी करून बाधित कुटुंबांना आर्थिक मदत द्यावी, घरांचे पंचनामे करून कायमस्वरूपी संरक्षणात्मक उपाययोजना राबवाव्यात तसेच पावसाळ्यानंतर या भागात दरडी व मातीची धूप रोखण्यासाठी ठोस नियोजन करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## २५ हजार पास्कल क्षमतेसह एल५० प्लस आणि एल५० दाखल




नवी दिल्ली (स. गांवकरी) : घरगुती स्वच्छतेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतात एल५० प्लस आणि एल५० ही दोन नवी रोबोटिक स्वच्छता यंत्रे बाजारात दाखल केली आहेत. परवडणाऱ्या किमतीत उच्च क्षमतेची स्वच्छता, स्वयंचलित कार्यप्रणाली आणि बुद्धिमान नियंत्रण प्रणाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही उत्पादने सादर करण्यात आली आहेत. दोन्ही मॉडेल्समध्ये २५ हजार पास्कल सक्शन क्षमता, कडा व कोपरे प्रभावीपणे स्वच्छ करणारे मॉप एक्स्टेंड तंत्रज्ञान, गालिचा ओळखून पुसणीचा भाग वर उचलणारी बुद्धिमान मॉप लिफ्ट प्रणाली, अडथळे ओळखणारी प्रगत नेव्हिगेशन व्यवस्था आणि मोबाईल अनुप्रयोगाद्वारे नियंत्रण अशा सुविधा देण्यात आल्या आहेत. ड्रीमे इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनू शर्मा यांनी सांगितले की, भारतीय ग्राहक आता अधिक स्मार्ट आणि वेळ वाचवणाऱ्या तंत्रज्ञानाला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे प्रगत स्वच्छता तंत्रज्ञान सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याचा कंपनीचा प्रयत्न असून, एल५० मालिकेद्वारे घरगुती स्वच्छतेसाठी नवा मापदंड निर्माण होईल.

## क्रेझी क्रेटोसने विजेतेपद पटकावले




पुणे (स. गांवकरी) : रायझिंग स्टार रोहित "क्रॅटोस" सक्सेना च्या नेतृत्वाखालील 'क्रेझी क्रॅटोस' संघाने क्राफ्टन इंडिया ई-स्पोर्ट्स रायझिंग स्टार्स प्रोग्राम मधील खेळाडूंसाठी खास आयोजित केलेल्या, भारतातील पहिल्या बीजीएमआय न्व्हिटेशनल स्पर्धेत 'क्राफ्टन इंडिया रायझिंग स्टार इन्व्हिटेशनल 2026' मध्ये विजेतेपद पटकावले. तीन दिवस चाललेल्या आणि एकूण 18 सामन्यांमध्ये रंगलेल्या चुरशीच्या स्पर्धेनंतर क्रेझी क्रॅटोस ने 193 गुण आणि तीन विनर विनर चिकन डिनर्स (डब्ल्यूडब्ल्यूसीडी) मिळवत विजेतेपद मिळवले.

# महावितरण विरोधात खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा

## 'स्मार्ट मीटरची सक्ती खपवून घेणार नाही; वाढीव वीजबिले रद्द करा, अन्यथा तीव्र आंदोलन'

पारनेर : (स. गांवकरी)



महावितरणच्या कथित गलथान कारभाराविरोधात तसेच शेतकरी व सर्वसामान्य ग्राहकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर येथे शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात आला. वाढीव वीजबिले, अघोषित भारनियमन, स्मार्ट मीटरची सक्ती, ट्रान्सफॉर्मर बदलण्यास होणारा विलंब, सोलर योजनेतील गैरप्रकार आणि अधिकाऱ्यांच्या अरेरावीविरोधात शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत महावितरण प्रशासनाला निवेदन सादर केले.

यावेळी बोलताना खासदार निलेश लंके म्हणाले, राज्य सरकार एका बाजूला स्मार्ट मीटरची सक्ती नसल्याचे सांगत असताना दुसऱ्या बाजूला शहर व ग्रामीण भागात नागरिकांवर दबाव टाकून स्मार्ट मीटर बसविले जात आहेत. हा प्रकार तातडीने थांबवावा. जिल्ह्यात कुठेही जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवू देणार नाही. जनतेच्या प्रश्नांसाठी प्रसंगी तीव्र आंदोलन उभारण्यासह जेलमध्ये जाण्याचीही तयारी असल्याचा इशारा त्यांनी दिला.

महावितरणच्या अधीक्षक अभियंता विजयकुमार पवार यांना निवेदन देताना खासदार लंके यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. काही अधिकारी व कर्मचारी पैसे घेतल्याशिवाय काम करत नसल्याच्या तक्रारी सातत्याने येत असून, तक्रारदारांशी अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. सिंगल फेज योजना नसलेल्या गावांना तातडीने वीजपुरवठा द्यावा आणि प्रलंबित तक्रारी निश्चित कालमर्यादित निकाली काढाव्यात, अशी मागणी त्यांनी केली. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे श्रीगोंदा तालुका व नगर शहरात निष्पाप नागरिकांचा जीव गेल्याचा उल्लेख करत संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी आणि कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली. शेवगाव तालुक्यात बांबूच्या आधारावर वीजतारा ओढण्यात आल्याचे प्रकार तसेच नगर शहरातील अनेक भागांमध्ये उघड्या अवस्थेतील डीपीमुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचा मुद्दा उपस्थित करत पावसाळ्यात दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

मोर्चादरम्यान शेतकऱ्यांनी वाढीव वीजबिले कमी करणे, ग्रामीण भागातील अघोषित भारनियमन बंद करणे, जळालेले ट्रान्सफॉर्मर त्वरित बदलणे, नुकसानग्रस्त पोल व वीजतारा दुरुस्त करणे, डीपीअभावी पिकांचे होणारे नुकसान टाळणे, महावितरणचे साहित्य उपलब्ध करून देणे, सोलर योजनेतील प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, अतिरिक्त पैशांची मागणी करणाऱ्या एजन्सींवर कारवाई करणे आणि अंदाजे रीडिंगऐवजी प्रत्यक्ष मीटर रीडिंग घेण्याची व्यवस्था सुरू करणे, अशा विविध मागण्या प्रशासनासमोर मांडल्या. महावितरण प्रशासनाने पुढील पंधरा दिवसांत सर्व प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत. अन्यथा जिल्हाभर अधिक तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा खासदार लंके यांनी दिला. या मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष प्रा. सिताराम काकडे, रामेश्वर निमसे, माजी नगरसेवक दीप चव्हाण, नगरसेवक योगीराज गाडे, गोविंद मोकाटे, रेवजी नांगरे,रवींद्र राजदेव ,अर्जुन भालेकर,यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# श्री शिशिर बजाज 'महाराष्ट्र का गौरव' पुरस्काराने सन्मानित

नवी दिल्ली : (स. गांवकरी)



नवी दिल्ली येथील हयात रीजेन्सीमध्ये आयोजित भव्य समारंभात नवभारततर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी, वरिष्ठ कॅबिनेट मंत्री, धोरणकर्ते, उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि देशभरातील प्रतिष्ठित पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या विशेष आवृत्तीत बजाज समूहाचे चेअरमन एमेरिटस आणि बजाज फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. शिशिर बजाज यांच्यावर आठ पानांचे विशेष लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. या लेखामध्ये स्वातंत्र्यसैनिक, समाजसेवक, उद्योगक्षेत्रातील अग्रणी आणि महात्मा गांधींचे दत्तक पाचवे पुत्र म्हणून ओळखले जाणारे संस्थापक श्री. जमनालाल बजाज यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्यात श्री. शिशिर बजाज यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचा आढावा घेण्यात आला आहे. या कार्यक्रमात श्री. शिशिर बजाज यांचा भारतीय उद्योगक्षेत्रातील, विशेषतः साखर आणि इथेनॉल क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल तसेच ग्रामीण विकास आणि सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्यभर केलेल्या कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. देशाच्या विकासात, उद्योग उभारणीत आणि समाजसेवेत 100 वर्षांपासून मोलाचे योगदान देणाऱ्या बजाज कुटुंबाला हा सन्मान एका विशेष आणि ऐतिहासिक क्षणी मिळाला आहे. राष्ट्र प्रथम, आत्मनिर्भरता आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांवर उभारलेला बजाज समूहाचा वारसा काळानुसार भारताच्या गरजांनुसार सतत विकसित होत गेला आहे.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील भ्रष्ट अधिकाऱ्यावर शासनाकडून कारवाई

## काँग्रेसचे संभाजी माळवदे यांच्या पाठपुराव्यास यश



**"आझाद मैदानावर आंदोलन करणार"**

या भ्रष्टाचाराची व्याप्ती अहिल्यानगर जिल्ह्यापूर्ती मर्यादित नसून पूर्ण राज्यभर आहे. हजारो कोटींचा घोटाळा असून पूर्ण राज्यातील घोटाळे बहाद्दरावर कारवाई जोपर्यंत होत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही. याविरोधात लवकरच मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन करणार.

**- संभाजी माळवदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी.**

नेवासा : (स. गांवकरी)

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात राज्य सरकारने कठोर भूमिका घेत चार अभियंत्यांचे निलंबन करत घरचा रस्ता दाखवत मोठी कारवाई केली. यात दोन कार्यकारी अभियंता व दोन उपाभियंत्यांचा समावेश आहे. राज्यभरात जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या हजारो कोटींच्या कामात प्रशासन व ठेकेदार यांनी मिळून केलेला भ्रष्टाचार, कामे पूर्ण करण्यास झालेला विलंब,निकृष्ट दर्जाची कामे. कामातील अनियमितता या सर्व बाबींची समितीने केलेली चौकशी व सतत्यता समोर आल्याने हीं कारवाई करण्यात आल्याचे समजते.

मजीप्रा मधील घोटाळ्याचा

काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी तब्बल तीन वर्ष पाठपुरावा केला. याविरोधात अनेकदा आंदोलने केली. मजीप्राच्या नेवासा कार्यालयासमोर, अहिल्यानगर कार्यालयासमोर धरणे आंदोलने, टाळे ठोकण्याचे आंदोलने केली.राज्य सरकारकडे याबाबत चौकशीसाठी तक्रारी केल्या. शेवटी याविरोधात औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. माळवदे यांनी याबाबत पावसाळी अधिवेशनात नेवासा विधानसभेचे आमदार विठ्ठलराव लंघे यांना प्रश्न देखील उपस्थित करण्यासाठी निवेदन दिले. या सर्व पाठपुराव्यामुळे सरकारने समिती स्थापना करून चौकशी करत अहिल्यानगर मजीप्रा मधील चार अभियंत्याना निलंबित करत मोठी कारवाई केली. निलंबित केलेल्या या अधिकाऱ्यामध्ये एस.एस. दहिफळे ( उपअभियंता नेवासा ),एम.पी.धगधगे (तत्कालीन उपाभियंता नेवासा ) जी.एस.भोगावडे (कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर ) एस. आर.वारे ( तत्कालीन कार्यकारी,अभियंता अहिल्यानगर ) यांचा समावेश आहे. अजूनही मोठे अधिकारी यात समावेश असल्याची बातमी समोर येत आहे समिती करत असलेल्या चौकशीतून जी सत्यता समोर येईल त्यावरून घोटाळ्याची व्याप्ती व घोटाळे बहाद्दरांचे चेहरे समोर येईल. व शासन काय कारवाई करणार हेही जनतेला काही दिवसात दिसून येईल.

# पालखी प्रस्थान सोहळ्यात डॉ. विश्वासराव आरोटे सहभागी!

आळंदी : (स. गांवकरी)



"पंढरीची वारी आहे माझे घरी, आणिक न करी तीर्थव्रत..." या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा प्रत्यय देणाऱ्या भक्तिमय वातावरणात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे आळंदी येथून पंढरपूरकडे प्रस्थान झाले. मुसळधार पाऊस आणि इंद्रायणी नदीला आलेला महापूर यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या असतानाही वारकऱ्यांच्या उत्साहात कोणतीही कमतरता दिसून आली नाही. या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक सोहळ्यात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी उपस्थित राहून माऊलींचे दर्शन घेतले.

प्रस्थान सोहळ्यापूर्वी श्रींच्या चलपादुकांची मंदिर प्रदक्षिणा पार पडली. त्यानंतर पारंपरिक विधीनंतर पालखी गांधीवाड्यात विसावली आणि हजारो वारकऱ्यांच्या "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषात पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली. गळ्यात तुळशीमाळ, हातात भगव्या पताका आणि मुखी हरिनामाचा अखंड गजर करीत वारकरी भक्तिभावाने पालखी सोहळ्यात सहभागी झाले. भर पावसातही माऊलींच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांच्यासोबत आळंदी नगरपालिका नगरसेवक मनोहर दिवाणे तसेच दैनिक समर्थ गांवकरी समूहाचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर उपस्थित होते. या मान्यवरांना श्रींच्या अश्वांचे दर्शन घेण्याचा मान लाभला. प्रस्थान दिनानिमित्त पालखी मार्गावर करण्यात आलेले रेड कार्पेट स्वागत आणि मंदिर परिसरातील आकर्षक पुष्पसजावट भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती. दरम्यान, सततच्या मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहत असून नदीला महापूर आला आहे. त्यामुळे भाविकांचे पवित्र स्नान करण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. सुरक्षेच्या कारणास्तव आळंदीतील काही पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते. प्रदक्षिणा मार्गावर वाहनांना प्रवेश नसल्याने दिंड्यांचा प्रवास सुरळीत झाला, मात्र काही ठिकाणी पर्यायी नियोजनाचा अभाव आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले.

माऊली मंदिर परिसर, नगरप्रदक्षिणा मार्ग आणि संपूर्ण अलंकापुरी "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड नामघोषाने दुमदुमून गेली होती. या प्रसंगी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी माऊलींच्या चरणी नतमस्तक होत राज्यातील सर्व नागरिकांच्या सुख, समृद्धी, आरोग्य आणि शांततेसाठी प्रार्थना केली. तसेच वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून सामाजिक ऐक्य, समता, सेवा आणि भक्तीचा संदेश देणारी महाराष्ट्राची अमूल्य सांस्कृतिक परंपरा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# कॅलिफोर्निया बदामांसह आपली त्वचा अधिक चांगल्या प्रकारे समजून घ्या

पुणे : (स. गांवकरी)



8 जुलै रोजी जागतिक त्वचा आरोग्य दिन साजरा केला जात असताना, यावर्षीची संकल्पना "उत्तम ज्ञान, उत्तम त्वचा आरोग्य" ही निरोगी त्वचेसाठी योगदान देणाऱ्या घटकांना समजून घेण्याच्या महत्त्वावर प्रकाश टाकते. त्वचेची काळजी घेण्याच्या पद्धती प्रदूषणासारख्या बाह्य ताणांपासून त्वचेचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आधार देऊ शकतात, परंतु निरोगी, चमकदार त्वचा राखण्यासाठी आपल्या शरीराला पोषण देण्यासाठी आपण काय निवडतो हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. आवश्यक पोषक घटक प्रदान करणारा संतुलित आहार घेणे, ज्यामध्ये कॅलिफोर्निया बदाम, संपूर्ण धान्ये, वनस्पती आणि प्राणिज प्रथिने यांसारख्या त्वचेसाठी उपयुक्त पदार्थांचा समावेश असेल आणि त्यासोबत सक्रिय जीवनशैलीचा अवलंब केल्यास निरोगी त्वचा आणि एकूणच आरोग्यास मदत होऊ शकते. पोषक घटक तुमच्या त्वचेच्या संरक्षणात्मक आवरणाला, अखंडतेला आणि कार्यक्षमतेला आधार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. कॅलिफोर्निया बदाम हे असेच एक सुपरफूड आहे, जे नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध आहे आणि त्यामध्ये बी जीवनसत्त्वे, झिंक, तांबे आणि आवश्यक लिनोलिक आम्ल यांसह 24 पोषक घटक असतात, जे एकत्रितपणे पेशींचे संरक्षण करण्यास आणि त्वचेच्या संरचनेला योगदान देण्यास मदत करतात.

# संततधार पावसाने आंबेगाव तालुक्यात पूरस्थिती

## उसंत घेतलेला पाऊस समाधानकारक असूनही रौद्ररूप धारण केल्यामुळे मोठे नुकसान. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ पंचनामे करून मदत द्यावी !!

आंबेगाव : (स. गांवकरी)





आंबेगाव तालुक्यासह डिंभे धरण परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार व मुसळधार पावसामुळे संपूर्ण तालुक्यात पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. ऐन पावसाळ्यात विश्रांती घेतलेला पाऊस पुन्हा जोरदार बरसू लागल्याने शिवारात सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. ओढे, नाले, पाझर तलाव तुडुंब भरून वाहत असून घोडनदीने रौद्र रूप धारण केले आहे. त्यामुळे नदीकाठच्या अनेक गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली असून नागरिकांनी अत्यंत सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सततच्या पावसामुळे हुतात्मा बाबू गेनू जलाशय, डिंभे धरण परिसरातील पाणीसाठ्यात अवघ्या तीन दिवसांत मोठी वाढ झाली आहे. यामुळे घोडनदीच्या पात्रातील पाणीपातळी सातत्याने वाढत असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. घोडनदीकाठावरील पिंपळगाव (खडकी), कळंब, चांडोली, शिंदेवाडी, एकलहरे, निरगुडसर, भराडी यासह अनेक गावांतील नदीलगतच्या परिसरात पाणी शिरले आहे. दशक्रिया घाट, स्मशानभूमी, मंदिरे, बैलगाडा घाट, पाणीपुरवठा योजनांच्या मोटारी तसेच सार्वजनिक ठिकाणे आणि नदीकाठच्या शेतजमिनी पाण्याखाली गेल्या आहेत. काही ठिकाणी पाणीपुरवठा योजनांच्या मोटारी वाहून गेल्याचीही भीती व्यक्त करण्यात येत आहे.

मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी ओढे, नाले आणि नद्या दुथडी भरून वाहत आहेत. पुलांवरून पाणी जात असल्याने वाहतूक विस्कळीत झाली असून काही रस्ते, पूल आणि भराव खचल्याने सार्वजनिक मालमत्तेचेही मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडू नये तसेच पूरग्रस्त भाग आणि नदीपात्राजवळ जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

सततच्या पावसामुळे भाजीपाला पिके, जनावरांच्या चारापिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असले तरी दीर्घकाळानंतर झालेल्या समाधानकारक पावसामुळे भविष्यातील पाणीटंचाई आणि सिंचनाच्या चिंतेतून काही प्रमाणात दिलासा मिळाल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

युवासेना कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर यांनी प्रशासनाकडे मागणी करताना सांगितले की, ज्या शेतकरी बांधवांच्या घरांचे, शेतीपिकांचे तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे, त्या सर्व ठिकाणी महसूल व कृषी विभागाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना शासनाच्या नियमानुसार त्वरित आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी. तसेच पूरग्रस्त गावांमध्ये आवश्यक ती मदत, बचाव आणि सुरक्षा उपाययोजना युद्धपातळीवर राबवाव्यात, अशीही त्यांनी मागणी केली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## विद्यार्थीनी शिवानी भोसलेची ९२% गुणांसह घवघवीत यश



अक्कलकोट (स. गांवकरी) : कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनची विद्यार्थीनी शिवानी भोसले हिने ९२% गुणांसह घवघवीत यश मिळविले आहेत तिच्या या यशानंतर स्वामींचा आशिर्वाद देऊन चेअरमन महेश इंगळे यांनी गुणवंत विद्यार्थीनी शिवानी भोसले हिचा गौरव. श्री वटवृक्ष देवस्थान समिती संचलित कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी अंतिम वर्षाची विद्यार्थिनी कु.शिवानी नंदकिशोर भोसले हिने ९२% गुणांसह उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा गौरव वाढवला आहे असे मनोगत महाविद्यालयाचे व देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांनी व्यक्त केले. कु.शिवानी भोसले हिच्या या यशाबद्दल मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन शिवानीचा सत्कार करण्यात आला. यावेळी महेश इंगळे बोलत होते. पुढे बोलताना महेश इंगळे म्हणाले की मुलींनी शिक्षणात असे घवघवीत यश मिळवावे हाच आमचा उद्देश आहे. देवस्थान संचलित महाविद्यालयाचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवणे हा आहे. शिवानी सारख्या विद्यार्थिनी या उद्देशाचे उत्तम उदाहरण आहेत. शिवानीच्या कष्टाला आणि जिद्दीला आमचे वंदन असून तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तू अक्कलकोटचे नाव उज्ज्वल करशील स्वामींचा आशीर्वाद नेहमी तुझ्यासोबत आहेत अशा प्रकारच्या सदीच्छा व्यक्त केल्या. शिवानीच्या या यशाबद्दल देवस्थान व महाविद्यालय परिवाराकडून तिचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य नागनाथ जेऊरे, देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, शिवानीचे पालक नंदकिशोर भोसले, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.



## शहराध्यक्षपदी चनबसप्पा गुरुभेट्टी तर कार्याध्यक्षपदी सिद्धाराम तांबुळे

सोलापूर (स. गांवकरी) : बसवकल्याण क्षेत्र समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या बैठकीत सोलापूर जिल्हाध्यक्षपदी बसवराज दिंडोरे, सोलापूर शहराध्यक्षपदी चनबसप्पा गुरुभेट्टी आणि शहर कार्याध्यक्षपदी सिद्धाराम तांबुळे यांची निवड करण्यात आली. या निवडींचे उपस्थित पदाधिकारी व समाजबांधवांनी स्वागत करून अभिनंदन केले. उन्नती हॉटेल अँड लॉन्स, क्रांती चौक, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे प्रभारी डॉ. अमरनाथ सोलापुरे हे होते. यावेळी समितीचे प्रदेशाध्यक्ष माधवराव पाटील टाकळीकर (लातूर), प्रदेश उपाध्यक्ष विजयकुमार हत्तुरे (सोलापूर), प्रदेश सचिव प्रा. शेषराव शेटे, प्रा. सुनील हेंगणे, प्रा. राजेश विभुते, छत्रपती संभाजीनगरचे प्रमुख प्रदीप बुरांडे, वीरेंद्र मंगलगे, सचिन संगशेट्टी, गणेश वैद्य, छत्रपती संभाजीनगरचे नूतन जिल्हाध्यक्ष सचिन खैरे, जालना येथील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. कोरे, बबलू सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत बसव भारत उत्सव २०२७, नूतन अनुभव मंटप, बसवकल्याण क्षेत्र विकास उपक्रम, तसेच समाजातील धार्मिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक कार्यक्रमांच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी संघटन बळकटीकरणाच्या दृष्टीने विविध पदांवरील नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा प्रसार, समाज संघटन आणि बसवकल्याण क्षेत्राशी संबंधित उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. त्यांच्या निवडीमुळे सोलापूर जिल्हा व शहरातील समितीच्या कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## पत्नीची गोळी झाडून हत्या ; आरोपीला फाशीची शिक्षा द्या - पतीची मागणी



सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील चौंडेश्वरवाडी येथे माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील चौंडेश्वरवाडी येथे घडलेल्या उषा साठे हत्याकांडाने परिसरात खळबळ उडाली आहे. मृत उषा साठे व त्यांचे कुटुंब गेल्या सुमारे १० वर्षांपासून एका शेतात मजुरीचे काम करत होते. या प्रकरणात शेतमालक सचिन देशमुख याने उषा साठे यांच्या डोक्यात गोळी झाडून हत्या केल्याचा आरोप आहे. उषा साठे यांचे पती यांनी प्रस्तुत प्रतिनिधी शी संवाद साधताना सांगितले की, संबंधित आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. तसेच या तपासात अकलूज पोलीस अत्यंत चांगले सहकार्य करत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. मात्र, एवढ्यावरच न थांबता त्यांनी आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणीही केली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## आयडीएफसी फर्स्ट बँकेतून आता भविष्य निर्वाह निधी भरण्याची सुविधा

IDFC FIRST Bank

मुंबई (स. गांवकरी) : आयडीएफसी फर्स्ट बँकेने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ)च्या प्रणालीशी यशस्वी जोडणी पूर्ण करत भविष्य निर्वाह निधी (पीएफ) भरण्याची डिजिटल सेवा सुरू केली आहे. भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयांतर्गत कार्यरत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने भविष्य निर्वाह निधी देयके स्वीकारण्यासाठी आयडीएफसी फर्स्ट बँकेला अधिकृत मान्यता दिली आहे. या सुविधेमुळे उद्योग आणि आस्थापनांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या संकेतस्थळावरून थेट भविष्य निर्वाह निधीची देयके सुरू करता येणार असून, आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या वैयक्तिक आणि उद्योगांसाठीच्या इंटरनेट बँकिंग सेवेद्वारे ती सुरक्षितपणे पूर्ण करता येणार आहेत. या डिजिटल सुविधेमध्ये व्यवहारांची तत्काळ पुष्टी, वापरण्यास सुलभ प्रणाली, चालान त्वरित डाउनलोड करण्याची सुविधा तसेच नोंदी आणि हिशोब जुळविण्याची सोपी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे उद्योग-आस्थापनांना वैधानिक देयकांची पूर्तता अधिक जलद आणि अचूक पद्धतीने करता येणार आहे. या सेवेच्या प्रारंभप्रसंगी आयडीएफसी फर्स्ट बँकेचे किरकोळ ठेवी विभागाचे प्रमुख आशिष सिंह म्हणाले, "उद्योग-आस्थापनांसाठी कायदेशीर देयकांची वेळेत पूर्तता करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेशी जोडणी झाल्यामुळे ग्राहकांना आता आमच्या डिजिटल बँकिंग सुविधेद्वारे भविष्य निर्वाह निधीची देयके जलद, सुरक्षित आणि सहज भरता येतील.

# सोलापूरच्या बी-२ बाबत मुंबईत मोठा निर्णय

### रेसिडेन्सी अडीच तर कमर्शियल ५ चार्ज ; आमदार देवेंद्र कोठें यांचा पुढाकार

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर शहरातील बि-2 मिळकती संदर्भात मंगळवारी मुंबईत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विस्तार दालनात बैठक संपन्न झाली. या बैठकीला पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे हे उपस्थित होते. कोठेंच्या वतीने एडवोकेट उमेश मराठे यांनी सोलापूरच्या मिळकती संदर्भातली बाजू महसूलमंत्र्यांसमोर सविस्तर मांडली. या बैठकीला अजित देशमुख आणि मोहसीन शेख हे महसूल विभागाचे उपस्थित होते तसेच व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे सोलापूरचे कलेक्टर कार्तिकेयन व प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे यांनी उपस्थिती दर्शवली. देवेंद्र कोठे यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, या बैठकीमध्ये सोलापूर शहरातील ज्या सर्व मिळकतींवरची बि 2 हा सत्ताप्रकार लागलेला आहे अशी साधारणतः 813 मिळकती आहेत ज्याच्यामध्ये सर्व कुटुंबाची संख्या अंदाजात किमान 9000 इतकी आहे. या सगळ्या मिळकती येणाऱ्या आठ दिवसात कॅबिनेट प्रस्ताव करून मंजूर देण्याचा निर्णय या ठिकाणी झाला आहे. ज्याप्रमाणे सिंधी समाजाला विशेष योजना अंमलात आणली तसं सोलापूरसाठी बी 2 बाबतीत विशेष प्रस्ताव तयार करून सोलापूरच्या मिळकतींना सुद्धा ज्याचे रेसिडेन्सी वापर आहे अशा रहिवाश्यांना अडीच टक्के आणि ज्यांचं कमर्शियल वापर आहे म्हणजे वाणिज्य त्यांना 5% याप्रमाणेचा निर्णय झालेला आहे.

या बैठकीत सोलापूरच्या कर्णिक नगर आणि एकता नगरचा विषय सुद्धा उपस्थित केला. त्या मिळकती हा बी टू मध्ये मोडत नसून त्यांच्या उताऱ्यावर ग म्हणजे गव्हर्मेंट असा उल्लेख आहे आणि त्याबाबतच्या नियमावली महसूल विभागाची वेगळे असल्यामुळे तिथली वस्तुस्थिती सुद्धा महसूल मंत्री यांच्या समोर मांडली आहे. ह्या जमिनी अर्बन सिलिंग अंडर असल्याने शासनाने जमा करून घेऊन त्यावेळच्या किमतीने इकडच्या कर्णिक नगरच्या सोसायटीला अलाउट केलेल्या आहेत अशा असताना त्याच्यावरती ग उल्लेख झालेला आहे आणि त्याची भरायची सरकारी रक्कम ही मोठ्या प्रमाणात असून त्यांचाही बाबत निर्णय होण्याची विनंती त्या ठिकाणी केल्यानंतर एडवोकेट मराठे यांनी त्यांची बाजू मांडली. त्यावेळेस बावनकुळे यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांना सूचना केल्या की, येणाऱ्या आठ दिवसात सर्व कर्णिक नगरचे कागदपत्र तपासून त्या मिळकती सुद्धा बी 2 प्रमाणे त्यांचा निर्णय देता येतो का? याबाबतचा अहवाल पाठवण्यात सांगितलेला आहे तसेच सात रस्ता परिसरातील सोलापूर सोसायटी, विनायक नगर, डाक बंगल्यासमोरील सोसायटी सुद्धा या उताऱ्यावरती बी 1 असा उल्लेख झालेला आहे. तीही सोसायटी त्यावेळेस ब्रिटिश काळामध्ये रीतसर खरेदी खताने विक्री करून त्याचा कबुल्यात सुद्धा संस्थेकडे आहे तर त्यांना बी वन संबोधन उचित न करता त्या मिळकती बी 2 मध्येच मोडतात ही बाब महसूल मंत्री यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी त्या सोसायटीच्या बाबत सुद्धा कलेक्टर कार्तिकेयन यांना सगळे कागदपत्र तपासून सदर मिळकत बी 2 मध्ये मोडता येतात का ही खात्री करून प्रस्ताव पाठवण्याच्या सूचना केल्या. परंतु ज्या जवळपास 800 हून अधिक मिळकत या हे आज रोजी उताऱ्या वरती बी 2 हा उल्लेख आहे त्यांचा निर्णय येणाऱ्या कॅबिनेटमध्ये होणार असल्याचे ते म्हणाले.



## ध्येयांशी जुळवून घेण्यासाठी तयार केलेला आर्थिक उपाय

पुणे : (स. गांवकरी)

आजचे ग्राहक एकाच वेळी अनेक आर्थिक ध्येयांचा पाठपुरावा करत आहेत. घर खरेदी करणे, मुलाच्या शिक्षणासाठी निधी उभारणे, उत्पन्नाचा दुसरा स्रोत निर्माण करणे, निवृत्तीचे नियोजन करणे किंवा प्रियजनांसाठी वारसा घडवणे ही आता स्वतंत्रपणे उद्भवणारी ध्येये राहिलेली नाहीत. जसजसे आयुष्य पुढे जाते, तसतशा आकांक्षा आणि प्राधान्यक्रमही बदलतात आणि त्यानुसार उपायही बदलायला हवेत. समस्या अशी आहे की अनेक आर्थिक उपाय एकाच उद्दिष्टासाठी तयार केलेले असतात. तथापि, आयुष्यातील स्वप्ने साकार करण्यासाठी अनेकदा असा उपाय आवश्यक असतो जो संरक्षण, उत्पन्नातील लवचिकतेची क्षमता आणि त्यासोबतच दीर्घकालीन आर्थिक सुरक्षा देतो. दी एडलवाइस लाइफ फ्लेक्सी ड्रीम प्लॅन वैशिष्ट्यपूर्ण पार्टिसिपेटिंग सेव्हिंग्ज लाइफ इन्शुरन्स प्लॅन आहे, जो ग्राहकांना त्यांच्या दीर्घकालीन ध्येयांच्या दिशेने काम करण्यास मदत करण्यासाठी संरक्षण, लवचिकता आणि संपत्ती-निर्मिती एकत्र आणतो आणि काळानुसार बदलत्या गरजांशी जुळवून घेतो. पार्टिसिपेटिंग प्लॅन असल्याने, वेळोवेळी जाहीर होणाऱ्या बोनसच्या माध्यमातूनही ग्राहकांना लाभ मिळवता येतो. एडलवाइस लाइफमध्ये आम्ही गेल्या १४ वर्षांपासून पार्टिसिपेटिंग पॉलिसींवर सातत्याने बोनस जाहीर केला आहे, जो पॉलिसीधारकांसाठी दीर्घकालीन मूल्य निर्माण करण्याकरिता आमची बांधिलकी दर्शवतो. आर्थिक ध्येये अधिकाधिक वैविध्यपूर्ण आणि गतिशील होत असलेल्या या काळात ग्राहक, लवचिकता, संरक्षण आणि दीर्घकालीन मूल्य निर्माण करण्याची क्षमता देणारे उपाय शोधत आहेत.

## 'रामायण'मधील प्रभू रामाच्या पहिल्या लूकमागील दागिन्यांचे रहस्य

मुंबई : (स. गांवकरी)

दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या बहुचर्चित 'रामायण' चित्रपटातील भगवान रामाच्या भूमिकेतील रणबीर कपूरचा पहिला लूक प्रदर्शित झाल्यानंतर त्यामागील दागिन्यांची कलात्मक निर्मितीही चर्चेचा विषय ठरली आहे. चित्रपटाचे अधिकृत दागिने भागीदार ट्राइब अम्रपाली यांनी प्रभू रामासह प्रमुख पात्रांसाठी भारतीय परंपरा, पुराणकथा आणि उत्कृष्ट हस्तकलेचा संगम साधणारे वैशिष्ट्यपूर्ण दागिने तयार केले आहेत. दिवाळी २०२६ आणि २०२७ मध्ये दोन भागांत प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात रणबीर कपूर भगवान राम, साई पल्लवी सीता, यश रावण, सनी देओल हनुमान तर रवि दुबे लक्ष्मण यांच्या भूमिका साकारणार आहेत. ट्राइब अम्रपालीने या प्रकल्पासाठी तब्बल १८ महिन्यांहून अधिक काळ संशोधन केले. अम्रपाली ज्वेल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सर्जनशील संचालक तरंग अरोरा यांच्या नेतृत्वाखालील डिझाइन



टीमने पुराणकथा, मंदिरशिल्प, प्राचीन भारतीय अलंकारकला, शिल्पकला आणि धार्मिक प्रतीकांचा सखोल अभ्यास करून चित्रपटासाठी स्वतंत्र दागिन्यांची दृश्यशैली विकसित केली. रामाच्या पहिल्या लूकमधील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे ३३५ ग्रॅम वजनाचा विशेष हार. हा हार भगवान रामाच्या दिव्य 'कोदंड' धनुष्यापासून प्रेरित असून तो चांदी आणि पितळ धातूपासून तयार करण्यात आला आहे. धर्म, शौर्य, मर्यादा आणि सूर्यवंशी परंपरेचे प्रतीक म्हणून या हाराची रचना करण्यात आली आहे. हारामध्ये धर्मचक्र, सूर्यचिन्ह, कमळ, मिथिलेतील पुष्पवाटिकेची प्रेरणा आणि सूक्ष्म पुष्पनक्षी यांचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. त्यामुळे हा दागिना केवळ अलंकार न राहता रामाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक बनला आहे. दागिन्यांच्या निर्मितीत उभारकाम, सूक्ष्म कोरीवकाम, जाळीदार धातुकाम, मण्यांची नक्षी आणि विणलेल्या साखळीचा वापर करण्यात आला आहे. प्रत्येक भाग स्वतंत्रपणे तयार करून नंतर एकत्र जोडण्यात आला असून, त्यातून राजेशाही वैभव आणि आध्यात्मिकता यांचा प्रभावी मिलाफ साधण्यात आला आहे. तरंग अरोरा यांनी सांगितले की, "'रामायण'सारख्या कालातीत महाकाव्यासाठी काम करणे हा आमच्यासाठी सन्मान आहे. हा प्रकल्प केवळ दागिने तयार करण्यापुरता मर्यादित नसून, भावी पिढ्यांसाठी रामायणाचे दृश्यविश्व घडविण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक दागिना पात्राचा स्वभाव, प्रवास आणि संस्कृती प्रतिबिंबित करतो."

चित्रपटाच्या निर्मात्यांनीही स्पष्ट केले की, चित्रपटातील प्रत्येक दागिना हा कथानकाचा अविभाज्य भाग आहे. पात्रांचा वारसा, व्यक्तिमत्त्व आणि प्रवास अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी प्रत्येक अलंकाराचे बारकाईने नियोजन करण्यात आले आहे.

ट्राइब अम्रपालीच्या या कलात्मक योगदानामुळे 'रामायण' चित्रपटात भारतीय पुराणपरंपरा, उत्कृष्ट हस्तकला आणि आधुनिक चित्रपटनिर्मिती यांचा अनोखा संगम पाहायला मिळणार असून, प्रभू रामाच्या पहिल्या लूकमधील दागिन्यांनी प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढवली आहे.

## बोलेरो जीप दरीत कोसळली; ३ जण गंभीर, १२ प्रवासी जखमी

### सुबीरच्या साप्ताहिक बाजारातून सिंगाणाकडे जात असताना भीषण अपघात; ब्रेक निकामी झाल्याचा प्राथमिक अंदाज

डांग (गुजरात) : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील सुबीर–नवापूर राज्य महामार्गावर मोक्हामाळ फाटकाजवळ बुधवारी दुपारी भीषण अपघात झाला. सुबीर येथे भरलेल्या साप्ताहिक हाटबाजारातून प्रवाशांना घेऊन सिंगाणाकडे निघालेली बोलेरो जीप अचानक चालकाच्या ताब्याबाहेर जाऊन रस्त्यालगतच्या दरीत कोसळली. प्राथमिक माहितीनुसार, जीपचे ब्रेक निकामी झाल्याने हा अपघात घडल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या अपघातात तीन प्रवासी गंभीर जखमी झाले असून, अन्य 12 प्रवाशांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. त्यानंतर सर्व जखमींना उपचारासाठी सुबीर सामुदायिक आरोग्य केंद्रात (CHC) दाखल करण्यात आले.

गंभीर जखमी झालेल्या तिघांना पुढील उपचारासाठी आहवा सिव्हिल रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे.अपघाताची माहिती मिळताच सुबीर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एच. बी. पटेल यांच्यासह पोलीस व प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांनी बचावकार्य आणि जखमींना रुग्णालयात पोहोचविण्यासाठी मोलाची मदत केली.



## 'सतलज' या आणखी एका धाडसी आणि आशयघन कथेची मेजवानी

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

धाडसी, समकालीन आणि विचार करायला लावणाऱ्या कथांसाठीचे प्रभावी व्यासपीठ म्हणून ZEE5 ने आपली ओळख अधिक दृढ केली असून, या प्रवासातील पुढचे पाऊल म्हणून आज 'सतलज' या भावस्पर्शी चित्रपटाचा प्रीमियर करण्यात आला आहे. सत्यघटनांपासून प्रेरित असलेला हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता धैर्य, हानी आणि न्यायासाठीच्या अथक संघर्षाची कथा मांडतो. हनी त्रेहान यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाची निर्मिती आरएसव्हीपी आणि मॅकगफिन पिक्चर्स यांनी केली आहे. दिलजीत दोसांझ यांच्यासोबत अर्जुन रामपाल, कंवलजीत सिंह, सुविंदर विक्की आणि गीतिका विद्या ओहल्यान यांच्या महत्त्वाच्या भूमिका असून हा चित्रपट आता केवळ हिंदी ZEE5 वर स्ट्रीम होत आहे. मानवाधिकार कार्यकर्ते जसवंत सिंह यांच्या जीवनावर प्रेरित असलेली 'सतलज' ही भीती, सत्तेचा दबाव आणि मौन यांच्या छायेत सत्याचा अखंड शोध घेणाऱ्या एका व्यक्तीची निर्भीड कथा आहे. संघर्ष आणि अस्थिरतेच्या काळातील पार्श्वभूमीवर घडणारा हा चित्रपट गूढरीत्या बेपत्ता झालेल्या हजारो लोकांचे भयावह वास्तव आणि न्यायाच्या शोधात भटकणाऱ्या त्यांच्या कुटुंबांनी सोसलेली अमानुष वेदना उलगडतो. सत्य दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यवस्थेला आव्हान देणारी कृती हेच सर्वांत मोठे धाडस असते, याची प्रभावी जाणीव करून देणारी ही कथा आहे.




# संत निळोबाराय पायीदिंडी पालखी सोहळयाचे १० जुलैला प्रस्थान

### पालकमंत्री, जिल्हाधिकारी, सीईओ, एसपी,विविध मंत्री, पद्मभूषण अण्णा हजारे आदींची उपस्थिती

(स. गांवकरी)

राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान " ब " वर्ग तीर्थक्षेत्र आणि प्रति पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेले पारनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र पिंपळनेर येथील, संतनिळोबाराय महाराज यांच्या पिंपळनेर ते पंढरपूर पालखी सोहळ्याच्या नियोजनाची बैठक पालखी सोहळा प्रमुख गोपाळकाका मकाशीर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.श्रीसंत निळोबाराय सेवा मंडळ व श्री संत निळोबाराय संस्थांच्या विद्यमाने, राज्यातील प्रमुख संतांपैकी एक असलेली ९ व्या क्रमांकाची मानाची पायीदिंडी पालखी सोहळा म्हणून ओळख असणाऱ्या, श्रीसंत निळोबाराय पायीदिंडी पालखी सोहळा या वर्षी श्रीक्षेत्र पिंपळनेर ते पंढरपूर या पालखी सोहळ्याचे प्रस्थान होणार असून,




संत निळोबारायांचा पायीदिंडी पालखी सोहळा हा शुक्रवार दि. १० जुलै २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता निळोबारायांच्या राहत्या वाड्यातून समाधी संजीवन समाधी मंदिराकडे होईल.

श्रीक्षेत्र पिंपळनेर येथून संत निळोबारायांच्या पालखी सोहळ्याचे दुपारी ३ वाजता संजीवन समाधी मंदिरातून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान होईल. त्या अगोदर एक तासाची किर्तनसेवा ह भ प मोहन आनंद महाराज परंदवडेकर पंढरपूर यांची होईल.या प्रसंगी भास्कर गिरीजी महाराज देवगड हे हजर राहणार आहेत. तसेच अनेक दिग्गज किर्तनकार व मोठ्या संख्येने वारकरी भाविकभक्त आणि दिंडी चालक विणेकरी व चोपदार महिलाभगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. प्रस्थान प्रसंगीची महापूजा हि अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आणि पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्या हस्ते होईल. तर, पालखीच प्रस्तानचा नारळ, अभंग गाथेचा प्रकाशन सोहळा, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील,राज्याचे उद्योग मंत्री ना.उदय सामंत व कृषिमंत्री ना.दत्तामामा भरणे, ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे, पद्मश्री पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. सदर कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष पारनेरचे आमदार काशिनाथ दातेसर हे राहणार आहे.

याप्रसंगी संपत त्रिंबक गाजरे, विजय गुगळे, राजेंद्र पठारे, नाथा रासकर, गोरख सालके, लक्ष्मण खामकर, चांगदेव शिर्के, भाऊसाहेब लटांबळे, पांडुरंग रासकर, पांडुरंग साबळे, अण्णासाहेब चत्तर,पांडुरंग सातपुते, तसेच पिंपळनेर ग्रामस्थ व पालखी सोहळ्यात सहभागी होणारे दिंडीचालक अध्यक्ष व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वर्षी रथासाठी रुईछत्रपती दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष स्व.बंडू बापूराव साबळे यांच्याकडून, तर नगारा बैलगाडीसाठी सिद्धेश्वर पायी दिंडी सोहळाचे हभप अण्णासाहेब महाराज चत्तर यांची बैलजोडी सेवेस असणार आहे. तरी,१० जुलैला सकाळी १०:३० वाजता निळोबारायांच्या राहत्या वाड्यातून दिंडीचे प्रस्थान होणार आहे, सदर प्रस्थान प्रसंगी राज्यातील वारकरी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्रीसंत निळोबाराय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अशोकराव सावंत यांनी केले आहे.

# HARISHCHANDRA COLLEGE OF NURSING AND RESEARCH CENTER, AKOLE

Tal - Akole, Dist- Ahilyanagar • Email : hmf.nc2022@gmail.com

Reg.No. 1489 Reg. Dt. 19.09.2024

## ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी नर्सिंग क्षेत्रात करिअरची सुवर्ण संधी..!

# प्रवेश देणे चालु आहे..!

**पहिल्या वर्षाचा 100% निकाल**

**(सन 2026 - 27 शैक्षणीक वर्ष)**

### ✻ मान्यता प्राप्त ✻

- इंडिअन नर्सिंग कौन्सिल, नवी दिल्ली
- महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व पॅरावैद्यकिय मंडळ, मुंबई
- महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई
- महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त



## G.N.M. जी.एन.एम.

### ✻ शैक्षणिक पात्रता ✻

डिप्लोमा कोर्स
१२ वी पास
आर्टस् / कॉमर्स / सायन्स
कालावधी 3 वर्षे



### ✻ सुविधा व संधी : ✻

- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, शासकीय, निमशासकीय, परदेशात, महानगर पालिका, नगरपालीका, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, खाजगी रुग्णालय, जिल्हा परिषद रुग्णाल १००% नोकरीची सुवर्णसंधी.
- मुलींकरीता सर्व सोयींनीयुक्त होस्टेल व मेसची सुविधा.
- प्रात्यक्षिक व क्षेत्रीय अनुभवासाठी सुपर मल्टी स्पेशालिटी रुग्णालय, मनोरूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये
- सुसज्ज लॅब, सुसज्ज इमारत, भव्य ग्रंथालय, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
- अनुभवी प्राध्यापक वर्ग नामांकित हॉस्पीटलशी सलग्न नोकरीची हमी.
- एस.सी./एस.टी. विध्यार्थ्यांना (शासकिय नियमानुसार) १००% शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध
- नामांकित आरोग्य क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन
- महाराष्ट्रातील कळसुबाई, हरिश्चंद्र अभयारण्यातील निसर्ग सौंदर्य वन्य प्राणी यामध्ये साकारलाले १००% निकालाची यशस्वी परंपरा.
- घरगुती जेवणाची व्यवस्था, स्वच्छ निर्मळ परिसर
- आजच आपला प्रवेश निश्चित करा..!




### ✻ पत्ता ✻

हरिश्चंद्र मेडीकल फौंडेशन संचलित...

## कॉलेज ऑफ नर्सिंग आणि रिसर्च सेंटर



**डॉ.भांडकोळी एम्.के.**
M.B.B.S.,M.D. Medicine (Pune)
FCCM (Delhi) Mo.:9226526016

**डॉ.सौ.ज्योती भांडकोळी**
B.H.M.S.(Nashik), CGO,CCH,B.T.C.M.(Pune)
स्त्रीरोग व बालरोग तज्ञ व अक्युपंक्चर तज्ञ

के.जी.रोड, गडाख शोरुम समोर, अकोले, ता.अकोले-४२२ ६०१, जि.अ.नगर

नांव नोंदणीसाठी संपर्क ✆ 9420856016 / 9309145909 / 9623927177